रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १३२
www.ramprahar.com
बुधवार, २९ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# अंधारात जाहला उष:काल!

## बोगद्यात अडकलेल्या कामगारांची अखेर सुटका

### बचाव पथकाला १७ दिवसांनी यश



*उत्तरकाशीतील कामगार बांधवांच्या बचावकार्याचे यश सर्वांनाच भावूक करीत आहे. बोगद्यातून सुटका झालेल्यांना मी सांगू इच्छितो की तुमचे धैर्य आणि संयम सर्वांना प्रेरणा देत आहे. मी तुम्हा सर्वांना चांगले आरोग्य इच्छितो. या बचावकार्याशी संबंधित सर्व लोकांच्या उत्साहाला मी सलाम करतो. त्यांच्या शौर्याने व जिद्दीने कामगार बांधवांना नवसंजीवनी दिली. प्रत्येकाने माणुसकी, टीमवर्कचे अद्‌भूत उदाहरण ठेवले आहे.* **–नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

**उत्तरकाशी : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे बोगद्यात अडकलेल्या मजुरांची अखेर सुटका करण्यात आली आहे. या बोगद्यात ४१ कामगार अडकले होते. त्यांची १७ दिवसांनी मंगळवारी (दि.२८) सुटका करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी तसेच प्रशासनाने सुटकेचा निश्वास टाकला, तर संपूर्ण देशभरात आनंद व्यक्त करण्यात आला.

गेल्या १२ नोव्हेंबरपासून उत्तरकाशीतील सिल्क्यारा बोगद्यात तब्बल ४१ कामगार बोगद्यात अडकून पडले होते. तेव्हापासून या कामगारांच्या सुटकेसाठी दिवसरात्र रेस्क्यू ऑपरेशन सुरू होते. देशासह जगाच्या नजरा याकडे लागल्या होत्या. तब्बल १७ दिवसांनी या ४१ कामगारांना बाहेर काढण्यात आले.

कामगारांच्या सुटकेसाठी विविध यंत्रणा उत्तराखंडमध्ये एकवटल्या होत्या. प्रचंड कष्ट, अत्याधुनिक यंत्रणांच्या मदतीने या कामगारांसाठी अन्न–पाणी, मोबाईल, तणाव कमी करण्यासाठीच्या वस्तू पाठवण्यात आल्या होत्या. शेवटी बोगद्यापाशी अँब्युलन्स तयार ठेवण्यात आल्या होत्या तसेच कामगारांच्या वैद्यकीय तपासणीसाठी बांधकामाच्या ठिकाणीच तात्पुरत्या रुग्णालयाची सोय करण्यात आली होती. कामगार बाहेर येताच सर्वांनी आनंद व्यक्त केला.



(छाया : विकास म्हात्रे)

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार

## कानपोली येथील महिला ग्रामसंघाच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांसह विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यानुसार त्यांनी तालुक्यातील कानपोली येथे महिला सक्षमीकरणासाठी स्वखर्चातून झाशीची राणी महिला ग्रामसंघाचे कार्यालय उभारले आहे. या कार्यालयाचे उद्‌घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि.२८) झाले.

या ग्रामसंघामध्ये १४ बचत गट मिळून १४० महिलांचा समावेश आहे. ग्रामसंघ कार्यालयाच्या उद्‌घाटन समारंभास भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, एकनाथ देशेकर, प्रकाश खैरे, खेरणेचे सरपंच शैलेश माळी उपसरपंच राजेंद्र





गोंधळी, दीपक उलवेकर, अशोक साळुंखे, राजेश पाटील, चंद्रकांत पाटील, संध्या शारबिद्रे, माजी नगरसेविका ॲड.वृषाली वाघमारे, माजी सरपंच कमला देशेकर, बाळकृष्ण पाटील, निवृत्ती पाटील, बाबुराव पाटील, प्रदीप मधे, उमेश पाटील, दिनेश पाटील अक्षय पाटील, काशिनाथ पाटील, संजय पवार, रमेश मते, शोभा मते, राणी पाटील, पूनम पाटील, मंजुळा पाटील, कविता मते, बामा उघडा, नंदा पारधी, शनिवार गिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या वेळी बोलताना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी महिला सक्षमीकरणासाठी तसेच त्यांना नवनवीन उद्योग उपलब्ध करून देण्यासाठी भाजप तुमच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही दिली.

# पृथ्वीराजबाबांना राष्ट्रवादीविरोधात काम करायला दिल्लीतून पाठवण्यात आले होते

## खासदार सुनील तटकरेंचा पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणावरून राज्यात आरोप–प्रत्यारोप होताना दिसत आहेत. अशातच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी, राष्ट्रवादी काँग्रेसने सरकार पाडले. तसे घडले नसते तर मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा तेव्हाच मिटला असता, असा आरोप केला. याला उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्ट शब्दांत प्रत्युत्तर दिले.

खासदार तटकरे म्हणाले की, पृथ्वीराज चव्हाण हे ज्येष्ठ



राजकारणी आहेत असे इतके दिवस मानत होतो, परंतु अलीकडे त्यांना हा विनोद का सुचला हे माहिती नाही. २०१४मध्ये मंत्रिमंडळात होतो. राणे समिती नेमली गेली आणि मराठा समाजाला आरक्षण दिले गेले, मात्र ते उच्च न्यायालयात टिकले नाही. त्यामुळे २०१४मध्ये सत्ता गेल्यावर ते टिकले नाही किंवा राष्ट्रवादीमुळे टिकले नाही हे बोलण्यामागे त्यांचा हेतू काय आहे हे कळू शकले नाही. एक बाब नक्की आहे की २०१४मध्ये काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेसने मागितलेल्या जागांवर पहिले उमेदवार जाहीर केले. मी त्या वेळी प्रदेशाध्यक्ष होतो. आम्हाला गाफील ठेवून कुठल्या जागा हव्यात याची माहिती काढून घेतली. प्रघात असा आहे की निवडणूकपूर्व दोन राजकीय पक्षांची युती किंवा आघाडी होत असते. त्यानंतर यादी घोषित करतात, पण पृथ्वीराज चव्हाण यांना राष्ट्रवादीच्या विरोधात काम करण्यासाठी सुपारी देऊनच दिल्लीतून पाठवण्यात आले होते. **(पान २ वर..)**

# उपमुख्यमंत्री अजित पवार आज कर्जतमध्ये

**कर्जत : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कर्जत तालुका कार्यालयाच्या उद्‌घाटनासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बुधवारी (दि.२९) कर्जत येथे येत आहेत. त्यानंतर ते पोलीस परेड मैदानावर कार्यकर्त्यांच्या जाहीर सभेस मार्गदर्शन करणार आहेत.

या सभेस राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री धनंजय मुंडे, आदिती तटकरे, महिला अध्यक्ष रूपाली चाकणकर, आमदार सुनील शेळके, आमदार अनिकेत तटकरे आदी उपस्थित राहणार आहेत.

## निवडक

### अद्वय हिरे यांचा जामीन अर्ज कोर्टाने फेटाळला

**नाशिक :** रेणुका सूत गिरणीसाठी जिल्हा बँकेकडून साडेसात कोटी रुपयांचे कर्ज घेऊन त्याची परतफेड न केल्याने अटकेत असलेले ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांचा जामीन अर्ज मालेगाव न्यायालयाने फेटाळला आहे. हिरे यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने त्यांना मंगळवारी (दि.२८) न्यायालयात हजर करण्यात आले. या वेळी न्यायालयाने पुन्हा त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### हार्बर लोकलचा प्रवास पुढील वर्षी होणार वेगवान

**मुंबई :** मध्य रेल्वेने हार्बर मार्गावरील लोकल ट्रेनचा वेग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी रेल्वे रूळालगत असलेले अतिक्रमण हटवण्यात येणार आहे. त्यानंतर हे काम सुरू केले जाईल. हार्बर मार्गावरील रेल्वेचा वेग सध्या ८० किमी प्रतितास इतका आहे. हा वेग वाढवून १०५ प्रतितास इतका करण्यात येऊ शकतो.




**मुंबई :** राज्यातील पोलीस पाटीलांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरू आहे. भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या ठिकाणी मंगळवारी भेट दिली आणि पोलीस पाटीलांच्या मागण्यांसंदर्भात येत्या हिवाळी अधिवेशनात शासकीय स्तरावर लक्ष वेधण्याचे आश्वासन दिले. या वेळी पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## खोटे शपथपत्र बनवून शासनाची फसवणूक प्रकरण

# शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिराचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रॉपर्टीसाठी मयत वडिलांचे खोटे शपथपत्र बनवून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल तक्का येथील शेकापचा माजी नगरसेवक सुनील गोविंद बहिरा यास पनवेल पोलिसांनी गजाआड केले असून गुन्ह्याचे गंभीर स्वरूप पाहता न्यायालयाने अधिक चौकशीसाठी त्याला २८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. आता या पोलीस कोठडीत तीन दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिरा याने सन १९९७मध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे तत्कालीन पनवेल नगर परिषदेकडून अंतिम भूखंड क्रमांक १६३३ ब आणि १६३७वर इमारत बांधकाम परवानगी मिळवलेली आहे. हे दोन्ही भूखंड हे सुनील बहिरा यांचे वडील कै. गोविंद काथोर बहिरा यांच्या मालकीचे होते. गोविंद बहिरा यांचे निधन १७ नोव्हेंबर १९७७ रोजी झालेले आहे. असे असताना सुनील बहिरा याने मयत वडिलांच्या जागी तोतया व्यक्ती उभा करून पनवेल कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर २० रुपयांच्या स्टॅम्पवर शपथपत्र केलेले आहे



कै. गोविंद बहिरा हे सन १९७७मध्ये मयत झालेले असताना प्रॉपर्टीसाठी सुनील बहिरा याने १९९७ साली त्यांच्या नावाने शपथपत्र केले असून वडिलांचा खोटा अंगठा स्टॅम्पवर मारून मयत व्यक्तीला जिवंत दाखवत बांधकाम परवानगी मिळवली होती. अशा प्रकारे शासनाची फसवणूक केल्याबद्दल विशाल पगडे यांनी पोलिसांकडे दाद मागितली. मागील महिन्यात दाखल झालेल्या गुन्ह्याचा पाठपुरावा त्यांनी केल्याने अखेर सुनील बहिरावर भा.दं.वि. कलम ४१७, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **(पान २ वर..)**

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे कलात्मक जिम्नॅस्टिक स्पर्धेत यश




**खारघर : रामप्रहर वृत्त**

अम्यॅचुर जिम्नॅस्टिक असोसिएशन ऑफ रायगडतर्फे पेण येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कलात्मक जिम्नॅस्टिक स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने यश प्राप्त केले आहे.

जिम्नॅस्टिक स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी सिया पाटील (इयत्ता आठवी) हिने १५ वर्षाखालील मुलींच्या गटात सहभाग घेऊन तृतीय क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिया व तिला मार्गदर्शन करणारे शिक्षक सूरज पाटील यांचे कौतुक करून अभिनंदन केले. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी उपस्थित होते.

## अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

# २५ कलाकृती अंतिम फेरीत दाखल

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा वर्ष १०वे गौरव रंगभूमीचा..!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत विविध केंद्रांवर झालेल्या प्राथमिक फेरीनंतर एकूण २५ एकांकिकांची अंतिम फेरीसाठी परीक्षकांनी निवड केली आहे. अंतिम फेरी ८ ते १० डिसेंबरदरम्यान सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत रंगणार आहे.

श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतरही पारितोषिके आहेत, तर यंदाच्या जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशविकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान स्व.भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे पुढे चालू राहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे व हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. **(पान २ वर..)**

### प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या एकांकिका

प्रताप महाविद्यालय, अमळनेर (तो, पाऊस आणि टाफेटा), माणुसकी मल्टिपर्पज फाउंडेशन, बुलढाणा (अनपेक्षित), अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक (अ डील), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर (असणं नसणं), आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे (शहीद), कलाकार मंडळी, पुणे (चाहुल), मराठवाडा मित्रमंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे (सिनेमा), रेवन एंटरटेंमेंट, पुणे (हॅलो इन्स्पेक्टर), फनकार क्रिएटीव्ह, अहमदनगर (बोळवण), सीकेटी महाविद्यालय (स्वायत्त), नवीन पनवेल (काक्षी), बॅकस्टेज वाला ग्रुप, पनवेल (आऊट बर्स्ट), त्रिकुटालय थिएटर, पनवेल (क्वीन ऑफ द नाइट), ढ मंडळी, कुडाळ (ढीम टँग, ढीटँग), एम.डी. कॉलेज, मुंबई (पुंडलिका भेटी), खालसा महाविद्यालय, मुंबई (लोकल पार्लर), रंगसंगती, मुंबई (सुमित्रा), ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे (उणिवांची गोष्ट), व्हाइट लाईट, ठाणे (अनोळखी), नटवर्य रंगमंच, विरार (नारायणास्त्र), केईएस कॉलेज, मुंबई (अलाऊ मी), कलांश थिएटर, मुंबई (जिन्याखालची खोली), स्वर्ण पटकथा, क्राऊड (खुदिराम), नाट्यस्पर्श आणि भवन्स कॉलेज, अंधेरी (टोपरं), वसा नाट्यपरंपरेचा (काव काव), निर्मिती, वसई (अम्मा).

# तीर्थक्षेत्री बसस्थानकावर रॅम्प असलेले वाहनतळ उभारावे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे देहू-आळंदी-पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसरात अत्याधुनिक बसस्थानक बांधून रॅम्पची सुविधा असलेले वाहनतळ उभारण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी (दि. २८) दिले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी खेड-आळंदी मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत आढावा बैठक घेतली. या बैठकीस आमदार दिलीप मोहिते-पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, डॉ. के. एच. गोविंदराज, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, ग्रामविकास



विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, गृह (परिवहन) विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे (रस्ते) सचिव सदाशिव साळुंखे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन शर्मा, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, तीर्थक्षेत्र आळंदी येथे आषाढी वारीसह वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक येतात. आलेल्या भाविकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये यासाठी पुरेशा वाहनतळाची व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. एसटी बसस्थानकांच्या इमारतीवर रॅम्पच्या सुविधेसह पार्किंग उभारण्याचा प्रस्ताव तयार करावा. शिवाय या आराखड्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग सुविधेचाही समावेश करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या, तसेच बसस्थानक परिसरातील रस्त्यांसाठी एसटी महामंडळाची ६५२ चौरस मीटर जागा प्रस्तावित आहे. त्यासाठी एसटीला जागेच्या मोबदल्याची रक्कम जिल्हा नियोजन समितीमधून देऊन जागा नगरपालिकेला हस्तांतरित करावी, असेही त्यांनी सांगितले.

### चाकणच्या हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करा

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, पुण्याच्या आजूबाजूला असणाऱ्या नगर परिषद क्षेत्रातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे नागरिकांना सोयीसुविधा देण्यात नगर परिषदांना मर्यादा येत आहेत. त्यामुळे शहराची हद्दवाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी दिलीप मोहिते पाटील यांनी केली आहे. नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी चाकणच्या हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

# भोराव-सवाद रस्त्यावर दोन दुचाकीस्वारांची हाणामारी

## पोलादपूर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड भोराव ते पोलादपूर तालुक्यातील सवाद गावाच्या रस्त्यावर सोमवारी (दि. २७) रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास दुचाकीस्वार तरूणांमध्ये फिल्मी स्टाईल हाणामारी झाली. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सर्फराज तारलेकर (वय २१) याने दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, सर्फराज हा त्याची दुचाकी (एमएच ०६ बीसी ८२९७) घेऊन महाडकडून सवादच्या दिशेने जात असताना भोराव गावाच्या हद्दीत आरोपी नईम तारलेकर (वय ४०) याने त्याच्या दुचाकी (एमएच ०६ एव्ही ००२४)वरून येत फिर्यादीच्या मानेवर फटका मारला, तसेच त्याच्या हातातील हेल्मेट फिर्यादी सर्फराज याच्या तोंडावर मारून दुखापत केली. ताजीम तारलेकर (वय २८) यानेदेखील फिर्यादीला संगनमताने मारहाण केली. याप्रकरणी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. विरोधी तक्रारीनुसार फिर्यादी नईम तारलेकर (वय ४०) हा त्याच्या दुचाकी(क्र.एमएच ०६ एव्ही ००२४)वरून महाडहून सवादच्या दिशेने जात असताना आरोपी सर्फराज तारलेकर (वय २१) याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मागून येऊन धडक दिली. कोणालाही अटक केलेली नाही. पोलीस नाईक घुले अधिक तपास करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकत्र या -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्या तालुक्यात शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. शेतकरी प्रोत्साहन अनुदानाचे ५० हजार रुपये तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळणे बाकी आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन बैठकीत मी पालकमंत्र्यांकडे कठोर भूमिका मांडली आहे. मी आमदार झालो तेव्हाच माझ्यासाठी राजकारण संपले. तेव्हा आता तरी सर्वांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राजकारण न करता एकत्र या, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड यांच्या वतीने कर्जत कृषी उत्पन्न बाजार येथे आधारभूत भात खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी कर्जत तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष काशिनाथ ठमके, उपाध्यक्ष मोहन पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित पाटील, यशवंत जाधव, प्रकाश फराट, गजानन पेमारे, चंद्रकांत मांडे यांसह संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

साधारण धान्याला २१८३ तर भात अ दर्जाला २३०३ रुपये भाव निश्चित करण्यात येऊन भात खरेदी करण्यात येणार आहे. संचालक चंद्रकांत मांडे यांनी सांगितले की, शेतकरी प्रोत्साहन अनुदान ५० हजार रुपये देण्यात येते. त्याचे २०१९मधील बहुतेक शेतकऱ्यांचे अनुदान येणे बाकी आहे. राजनाल्याची दुरुस्ती अद्याप झालेली नाही. अनेक ठिकाणी त्याला खांडी पडल्या आहेत. याबाबत आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष घालून त्यांनी शेतकऱ्यांच्या या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी केली.

## लायन्स पनवेल सरगमतर्फे विद्यार्थ्यांसाठी कराओके स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी कराओके गायन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धा इ. पाचवी ते सातवी आणि इ. आठवी ते १०वी अशा दोन गटात होणार आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी ९ डिसेंबर रोजी बांठीया हायस्कूल सभागृह येथे होणार असून अंतिम फेरी १७ डिसेंबर रोजी घेण्यात येईल.

स्पर्धकाने एक हिंदी किंवा मराठी गाणे चार मिनिट सादर करायचे आहे. आपल्या गाण्याचा ट्रॅक मोबाईल किंवा पेनड्राईव्हमध्ये आणायचा आहे. नाव नोंदणीसाठी (९८१९६५४४१९, ९८२०९७४७१५) या क्रमांकावर संपर्क करावयाचा आहे. प्रवेश फी रु. १५० असून प्रत्येक गटामधून ३ क्रमांक आणि २ उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील. प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# रसायनीत कारला धडक दिल्याने अपहरण करून मारहाण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कारला धडक दिली म्हणून चौघांनी राजेश काशिनाथ ठोंबरे (वय. ४२, रा. भोकरपाडा, ता. पनवेल) याचे अपहरण करून मारहाण करीत नुकसान भरपाई म्हणून चार लाख रुपयांची मागणी केल्याची घटना रसायनी पोलीस ठाणे हद्दीत घडली. या प्रकारणी अज्ञात आरोपींची अद्याप ओळख पटलेली नाही.

गुन्हे

राजेश रात्रीच्या सुमारास मोहोपाडा हद्दीत दांड-आपटा से. बी. रोड समोरून जात असताना सफेद रंगाची कारला धडक बसली. त्याचा मनात राग धरून सफेद रंगाच्या कारमधील अनोळखी चौघांनी राजेशला शिविगाळ करून मारहाण केली. एकाने चाकूचा धाक दाखवून ठार मारून टाकेन अशी धमकी दिली. भांडणात राजेशची सोन्याची चैन तुटून खाली पडली.

चौघा आरोपींनी राजेशला जबरदस्तीने त्यांच्या गाडीत टाकून त्यांचे अपहरण केले. रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील वावेघर येथील पेट्रोल पंपाच्या पाठीमागील निर्जनस्थळी घेऊन जाऊन अपघाताची नुकसानभरपाई म्हणून चार लाख रुपयांची मागणी केली.

घाबरलेल्या राजेशने पाच हजार रुपये ऑनलाईन आरोपीला पाठवले. चिडलेल्या आरोपीन ईको कारची काच फोडून नुकसान केले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई आर. म्हामुणकर करीत आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात संविधान दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व एससी व एसटी समितीच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला राज्यघटना दिली आणि ती देशाने स्वीकारली. २६ जानेवारी १९५०पासून ती देशात लागू झाली. २९ ऑगस्ट १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. या दिवसाचे औचित साधून भारतीय राज्यघटनेवर एका सत्राचे आयोजन व राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. या सत्रासाठी प्रमुख व्यक्ते म्हणून चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग इन्चार्ज प्रा.



आकाश पाटील यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भारतीय राज्यघटनेचे महत्त्व पटवून दिले व भारतीय राज्यघटनेतील वेगवेगळे कलमे, कर्तव्ये व अधिकाऱ्यांविषयी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनीना तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व भारतीय राज्यघटना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या भारतीय राज्यघटना दिनाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना व समन्वयक एससीओएसटी समिती प्रा. राहुल कांबळे यांनी केले, तसेच डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. करिश्मा कडव, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. महेश धायगुडे प्रा. कावेरी घोगरे व विद्यार्थी व विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## जागर, प्रास्ताविकेचे वाचन करून संविधान दिन साजरा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान जागर व प्रास्ताविकेचे वाचन करून संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी अधीक्षक माधुरी पाटील, समाज कल्याण निरीक्षक अंकुश पोळ, कनिष्ठ लिपीक श्रेयश खरोटे, कर्मचारी, तसेच मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अलिबाग व मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह या दोन्ही वसतिगृहातील गृहपाल एस. एफ. कदम व यु. एस. गुजेला उपस्थित होते.

कार्यालयाचे कर्मचारी माधुरी पाटील, अंकुश पोळ तसेच वसतिगृह गृहपाल एस. एस. कदम व यु. एस. गुजेला यांनी एकत्रित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले, तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संविधान जागर यात्रेमध्ये सहभाग घेतला.



# पनवेल महानगरपालिकेतर्फे स्वच्छ शौचालय अभियान

**पनवेल : रापप्रसहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार महापालिका कार्यक्षेत्रात स्वच्छ शौचालय अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत सार्वजनिक व सामुदायिक शौचालयाची देखभाल, सुशोभीकरण, दुरूस्ती व स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

१७ नोव्हेंबर हा जागतिक शौचालय दिवस म्हणून साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने स्वच्छ शौचालय अभियान राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या वतीने २५ डिसेंबरपर्यंत महापालिका कार्यक्षेत्रात स्वच्छ शौचालय अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत सार्वजनिक



व सामुदायिक शौचालयाची देखभाल, दुरूस्ती व स्वच्छता, करण्यात येणार आहेत, तसेच स्वच्छ शौचालय अभियान मधील सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांचे नामांकन My Gov पोर्टलवर भरण्यात येणार आहे. याशिवाय बचत गटामार्फत शौचालयाची वर्गवारी करण्याचे काम देण्यात येणार आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात ९० सार्वजनिक शौचालय आहेत. या सर्व शौचालयांवर स्वच्छता हर कदम या ॲपच्या माध्यमातून देखरेख केली जाते. या अभियानांतर्गत उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रातील अ, ब, क, ड या चारही प्रभागातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या सुशोभीकरण व दुरूस्तीच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

प्रत्येक प्रभागातील आरोग्य निरीक्षकांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाची रंगरंगोटी, दुरूस्ती करून साफसफाई करण्याचे काम सुरू केले आहे.

पान १ वरुन

## पृथ्वीराजबाबांना राष्ट्रवादीविरोधात काम करायला दिल्लीतून पाठवण्यात आले होते

निवडणूकपूर्व युती होऊ शकली नाही. त्यानंतर मी, प्रफुल्ल पटेल व अजित पवार यांनी राजभवनावर जाऊन निवडणुका सोबत लढणार नसू तर अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यामुळे सत्तेला चिकटून राहण्याला अर्थ नव्हता. म्हणून सत्तेतून बाहेर पडण्याचा निर्णय शीर्षस्थ नेतृत्वाकडे चर्चा करून घेतला होता. काँग्रेस राज्यात चौथ्या क्रमांकावर गेली, त्याला कारण पृथ्वीराज चव्हाण आहेत, अशी टीकाही खासदार तटकरे यांनी या वेळी केली.

## शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिराचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला

आरोपी सुनील बहिरा यास २४ नोव्हेंबर रोजी पनवेल न्यायालयात हजर केले असता गुन्ह्याचे गंभीर स्वरूप लक्षात घेता न्यायालयाने अधिक तपासासाठी त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली. पोलीस कोठडीची मुदत मंगळवारी (दि.२८) संपत असल्याने सुनील बहिराला न्यायालयात हजर करण्यात आले होते. या वेळी न्यायालयाने आरोपीच्या कोठडीत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढ केली आहे.

## २५ कलाकृती अंतिम फेरीत दाखल

प्राथमिक फेरीचे परीक्षक म्हणून भरत सावले व दिनेश गायकवाड यांनी काम पाहिले. अंतिम फेरीचे उद्घाटन ८ डिसेंबर रोजी, तर पारितोषिक वितरण १० डिसेंबरला होणार आहे. स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर अभिनेते अजिंक्य ननावरे, मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप, तर मीडिया प्रायोजक इट्स माजा डॉट कॉम आहे.

# मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मोर्बे धरणासाठी १९९०साली आठ गावे व सात आदिवासीवाड्यांच्या शेतजमिनीसह भूसंपादन झाले होते. भूसंपादन कायदा २०१३नुसार नव्या कायद्याने जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत सामाजिक परिणाम अहवाल सादर करून बारा पट मोबदल्यासह भूसंपादन व पुनर्वसन करावे, अशी मागणी मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांची आहे.

भूसंपादन कायदा २०१३प्रमाणे बारा पट मोबदल्यासह भूसंपादन व पुनर्वसन करावे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, महानगरपालिका, मेट्रो प्रकल्प व रेल्वे, ओएनजीसी, न्हावाशेवा,



जेएनपीए, पनवेल महानगरपालिका या प्रकल्पात ५० टक्के ठेकेदारी व नोकरी मोर्बे प्रकल्पातील मुलामुलींना प्रकल्पग्रस्त दाखले देऊन सहा महिन्याच्या आत मिळाव्यात, नोकरी मिळेपर्यंत बेकारी भत्ता मिळावा यांसह इतर मागण्या करण्यात आल्या आहेत.

**आमची जमीन व घरे शासनाच्या विकासासाठी १९८५ साली मोर्बे धरणाला मान्यता देऊन घेण्यात आली. मोर्बे धरण हे फक्त ५५३ कोटी रुपयाला २००९ साली नवी मुंबई महानगरपालिकेला विकण्यात आले व हस्तांतरित कले. जमिनी सरकारने लेखी कबूल केलेल्या ६५ ते ८० हजार रुपये एकरी न देता १४ हजार रुपये एकरी भावाने अत्यल्प किमतीने गेल्या.**

**-अनिल भऊड, उपाध्यक्ष, मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त समिती**

## मराठी पाट्या न लावणाऱ्या आणखी ११६३ दुकानांना नोटीसा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**पनवेल महापालिकेची कारवाई**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार महापालिका हद्दीतील चारही प्रभागांमधील मराठी नामफलक नसलेल्या ११६३ दुकाने व आस्थापानांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, तसेच प्रत्येक प्रभागात स्पीकरद्वारे जाहीररित्या सूचनादेखील केली जात आहे.

ज्या आस्थापनांनी अजूनही अमराठी पाट्या बदलल्या नाहीत अशा आस्थापनांचा सर्वेक्षण सुरू असून सदर आस्थापनांना महापालिकेकडून कारवाईच्या नोटीसा बजावण्यात येत आहेत. प्रभाग अ, ब, क ड मधील सुमारे ११६३ दुकाने तसेच आस्थानांना आत्तापर्यंत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रातील अनेक दुकाने व आस्थापनांवरील नामफलक फक्त इंग्रजीत व अन्य भाषेत आहेत. नियमाप्रमाणे नामफलक हे मराठी लिपीत व इतर कोणत्याही भाषेपेक्षा लहान नसावा असे नमूद आहे. त्यामुळे मराठी पाट्या न लावणाऱ्यांना कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या असून यापुढेही नोटीसा बजावण्याची कार्यवाही सुरूच राहणार आहे.

## निवडक

### ट्रेलरच्या अपघातात चालकाचा मृत्यू

**पनवेल :** जे.एन.पी.टी. ते पळस्पे रोडवर करंजाडे व डोबाळे कॉलेज कॉसींग ब्रिजवर झालेल्या दोन ट्रेलरच्या अपघातात चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ट्रेलर (एम.एच.४६ बी.एफ. २५७६) वरील चालकाची त्याच्या ताब्यातील ट्रेलरची समोर असलेल्या ट्रेलर (एम. एच.०४ जी.आर. ९३७६)ला ठोकर बसली. या अपघातात ट्रेलरवरील चालक सचिन महेश कुमार (वय २२, रा. शहागंज, जौनपुर) याच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने तो मयत झाला. यानंतर पळून जाणाऱ्या ट्रेलरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बसमध्ये तरुणीचा विनयभंग

**पनवेल :** चालत्या बसमध्ये १७ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी वाहका(कंडक्टर)वर पनवेल शहर पोलीस ठाण्यात विनयभंगासह पॉक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोषकुमार जनार्दन वाडेकर (वय ४८) असे आरोपीचे नाव आहे. पीडित तरुणी मुंबई येथे राहत असून ती रत्नागिरी येथे सरकारी रेशनचे धान्य घेण्यासाठी बहिणी सोबत गेली होती. त्यानंतर नालासोपारा ते मुंबई या एसटीने निघाली असता एसटी वाहकाच्या खिडकीच्या बाजूला ती तरुणी बसली. त्यावेळी नागोठणे गावाच्यादरम्यान झोपेत असताना वाहकाने तिचा विनयभंग केला. १०० नंबरवर कॉल करून घडलेल्या सर्व प्रकाराची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर ही बस पनवेल एसटी बस डेपो येथे आल्यावर वाहकाला पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

### अनधिकृत बांधकामावर सिडकोची कारवाई



**पनवेल :** खारघरमध्ये सिडकोच्या अनधिकृत नियंत्रण बांधकाम विभागाच्या वतीने येथील सेक्टर १० मधील निरसूख पॅलेस हॉटेलच्या अनधिकृत बांधकामावर आज कारवाई करण्यात आली आहे. सिडकोच्या जागेवर विनापरवाना बांधकाम केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या वेळी सिडकोचे पथक पोलिसांचा मोठा फौजफाटा, जेसीबीच्या साहाय्याने घटनास्थळी दाखल झाले होते. अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अधिकारी लक्ष्मीकांत डावरे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. खारघर शहरात सिडकोच्या ४८ पेक्षा जास्त भूखंडावर भूमाफियांनी कब्जा केला आहे. सिडकोची मोहीम थंडावल्याने शहरात अनधिकृत बांधकामांना पेव फुटले आहे. सिडकोने या कारवाईत सातत्यता ठेवण्याची मागणी होत आहे.

# क्रांतिसूर्य ज्योतिबा फुलेंना अभिवादन



## गव्हाण विद्यालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १३३व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम इयत्ता पाचवी 'ब'च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. वर्गशिक्षिका ए. पी. वर्तक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य जी.सी. गोडगे व उपप्राचार्य पी.बी.मंडले तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर तसेच समन्वय समितीचे जनरल बॉडी सदस्य आर.एस. भोईर ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पी.बी. पाटोळे, माणिकराव घरत, ग्रंथपाल महेश म्हात्रे, वरिष्ठ लेखनिक मढवी सर तसेच ज्येष्ठ शिक्षक जे.जे.ठाकूर, एस.एच.म्हात्रे, वृषाली म्हात्रे आदी रयत सेवकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

या वेळी प्राचार्य गोडगे सर यांनी प्रतिमा पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. सर्व रयत सेवकांनी प्रतिमा पूजन केल्यानंतर पाचवी ब मधील चिमुरड्यांनी महात्मा फुलेंबद्दल मराठी, हिंदी आणि इंग्रजीतून मनोगत व्यक्त केले. या वेळी प्रणव राणे आणि विद्यालयातील धडाडीची तोफ म्हणून ओळखली जाणारी आरोही नाळे, हिने हिंदीतून आपलं मनोगत व्यक्त केलं तर इंग्रजी भाषेतून सात्विक रवींद्र भोईर आणि मराठी भाषेतून सारा बालाजी केंद्रे यांनी महात्मा फुलेंना आदरांजली दिली. या वेळी गोडगे सरांनी या चिमुरड्यांचा विशेष कौतुक केले.

एक पुरुष शिकला तर तो फक्त एकटाच शिकतो. पण एक स्त्री शिकली तर, संपूर्ण कुटुंब शिक्षित होते, हा दूरदृष्टीकोन असलेल्या महात्मा फुलेंनी विद्येचे महत्त्व आपल्या जीवनात एवढे सांगितले की, त्यांच्याच कृपेने आज भारतातील आया बहिणी दिलखुलास पणे यथोचित शिक्षण घेत आहेत. त्यांची ही कृतज्ञता त्यांच्याबद्दलची ही कृतज्ञतेची ज्योत शेवटपर्यंत सर्वामध्ये तेवत राहावी, असे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी सांगितले. ज्येष्ठ शिक्षक जे.जे. ठाकूर यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

## जासई हायस्कूल

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज या शैक्षणिक संकुलात महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, थोर विचारवंत, क्रांतीसूर्य, महात्मा ज्योतिबा फुले यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर, विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन कार्य आपल्या मनोगतातून मांडले. विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख सर आणि जुनियर कॉलेज विभाग प्रमुख शिंदे सर यांनी कर्मवीरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनीही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन चरित्रावर भाषणे केली.

या कार्यक्रमासाठी उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत हे उपस्थित होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन केले. या कार्यक्रमासाठी यशवंत घरत, बाबुराव मढवी, शिक्षण प्रेमी नागरिक आणि सर्व सेवक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. जे. घरत यांनी केले.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय, उलवे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर या विद्यालयात मंगळवारी (दि. २८) क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

हा कार्यक्रम साजरा करण्याचे संधी सांस्कृतिक विभागाने आठवीच्या वर्गाकडे सोपविली होती. या वर्गातील विद्यार्थीनी वैभवी सोमासे हीने कार्यक्रमाचे सुसूत्र निवेदन करून कार्यक्रम उठावदार केला.

आठवीच्या वर्गातील विद्यार्थी चिन्मय महाले व सोहम वनमोरे या दोघांनी ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक कार्य आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले.

विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी जाती व्यवस्था, जुन्या रुढी परंपरा याबाबत केलेलं परीवर्तन व सत्यशोधक समाजाची स्थापना त्याबाबतची माहिती आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी मुलींनी शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे ही गरज ज्योतिबा फुले यांनी ओळखली होती असे विषद करून ज्योतिबा फुले यांचे कार्य ओघवत्यआ भाषणशैलीत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले. शरद खारकर यांनी अध्यक्ष भाषणातून शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या उपशिक्षिका व्ही. व्ही. गावंड, एस. डी. पाटील, पी. आर पवार, व्ही. टी. म्हात्रे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काळुंद्रे गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिर



(छाया : योगेश पाटील)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काळुंद्रे गावात पनवेल महापालिलेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभाला असून अनेक विद्यार्थी, नागरिक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला तसेच या वेळी आयुष्मान भारत कार्डचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### आयुष्मान भारत कार्डचेही नागरिकांना वाटप

पनवेल महापालिकेच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाना अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिर राबविण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ७च्या वतीने काळुंद्रे गावातील मरीआई मंदिराजवळ हे शिबिर राबवण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, सामाजिक कार्यकर्ते कुणाल म्हात्रे, गणेश घरत, विजय गायकवाड, सचीन चिखलेकर, वॉर्ड क्रमांक २०चे अध्यक्ष रघुनाथ बहिरा, रुपेश परदेशी, शक्तीकेंद्र प्रमुख बळीराम चिखलेकर, डॉ. अनिल पाटील, रिया माळी, खैराणी मिसबा, प्रल्हाद खुटले, प्रवीण पाटील, पुजा मंजुळे, शैला आंबेकर, दिपाली पेटेकर, पूजा वंजारी, प्रगती लोखंडे, श्वेता पाटील, रींकु गायकवाड, समीक्षा महाकाळ, कुणाल पाटील, गणेश म्हात्रे, विनोद पाटील, नीता घरत, रीता चीखलेकर, दर्शना पाटील, सीमा आर्य, पुजा नावेद, गौरी चिखलेकर आदी उपस्थित होते.

# उरण येथे अन्नकुट उत्सव साजरा



**उरण : वार्ताहर**

उरण कुंभारवाडा रोड येथील बीएपीएस स्वामी नारायण संस्कार केंद्र येथे नवीन वर्ष तसेच दिवाळी पर्व निमित्ताने भगवंताला अन्नकुट रूपाने विविध व्यजनाने भोग लावण्यात आला होता. या वेळी सुमारे २६७ प्रकारचे व्यजन (मिठाई) लावण्यात आले.

या कार्यक्रम सोहळ्यास स्वामी नारायण मंदिर दादर (मुंबई) चे पूज्य हरीनयन स्वामी व पूज्य सत्यचिंतन स्वामी यांच्या हस्ते आरती करण्यात आली. आरती झाल्यानंतर पूज्य संतांनी प्रवचनाचा लाभ दिला. सुमारे ५०० भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

या वेळी आमदार महेश बालदी, माजी नगरसेवक कौशिक शाह, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, राजेश पटेल, पारुल पटेल, शोभा शाह, जिमीशा पटेल, मोना पटेल, मीना पटेल, कनूभाई पटेल, मनन पटेल, हितेश शाह, चेतना कोळी, सुजाता कोळी, दिनेश ठक्कर, कीर्तन पटेल, चिराग पटेल, शशी कोळी, राजेश कोळी, हरिचंद्र कोळी, परबत मेर, सुरज ठवळे, करण ठक्कर, हर्ष चौरशिया, पुजारी अविनाश कोळी, सिधू कोळी, बबलू कोळी, नीलकंठ कोळी व मित्र मंडळी उपस्थित होते.

महिला कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले. सकाळी ९ ते दुपारी १२.३० पर्यंत प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# चला समजूया हृदयाला कार्यक्रमात डॉक्टरांनी दिला आरोग्याचा कानमंत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील चला समजूया हृदयाला कार्यक्रमात ज्येष्ठ हृदयरोगतज्ञा डॉ. केशव काळे आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. नितीश अरोरा यांनी खारघरवासियांना आरोग्याचा कानमंत्र दिला.



भारतीय संविधान दिन व २६/११ शहीद दिनाचे औचित्य साधून भाजप खारघर शहर आणि कोकण रहिवाशी संघाच्या वतीने रविवारी (दि. २६) चला समजूया हृदयाला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पनवेल महापालिकेतील भाजपचे माजी नगरसेवक रामजी गेला बेरा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात ज्येष्ठ हृदयरोगतज्ञा डॉ. केशव काळे यांनी हार्ट अटॅकचे प्रमाण का वाढतंय? त्याची कारणे आणि उपाय यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तर सिनिअर ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. नितीश अरोरा यांनी हाडांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. जी. के. डोंगरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी माजी नगरसेवक ॲड. नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, प्रज्ञा प्रकोष्ठ रायगड अध्यक्षा, ॲड. गीता चौधरी, भाजप महिला मोर्चा सोशल मीडिया महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक बिना गोगरी, नमो नमोचे संतोष शर्मा, गुरुनाथ गायकर, दिलीप जाधव, जयेश गोगारी, अनिता जाधव, निर्मला यादव, अश्विनी भुवड, अर्चना घोरपडे, नीलम विसपुते, नवनीत मारू, गहिनीनाथ नावडेकर, रमेश खडकर, भरत कोंढाळकर, संदीप माघाडे, संदीप राठोड, सनी नवघरे, संदीप रेड्डी, शेंलेन्द्र त्रिपाठी, अशोक जांगिड, विलास आलेकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनात भाजप खारघर शहर सरचिटणीस दिपक शिंदे, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, भाजप खारघर युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, सरचिटणीस अक्षय लोखंडे यांनी विशेष पुढाकार घेतला.

# 'सीकेटी'त २६/११ हल्ल्यातील शहीद जवानांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाच्या तर्फे रविवारी (दि. २६) २६/११ हल्ल्यामध्ये आपले सर्वस्व बलिदान केलेल्या जवानांना व सैनिकांना शोक शस्त्र देऊन आदरांजली अर्पित केली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे यांनी वर्तमान कालीन युवा पिढीचे कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले. या निमित्ताने नॅशनल कॅडेटस् कौरच्या कॅडेट्सनी देशभक्तीपर गीत व नृत्य सदर केले व काही कॅडेट्सनी फ्रीडम इज नॉट फ्री या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोट्रॅक्ट क्लब न्यू पनवेलचे अध्यक्ष गिरीश समुद्रे, सदस्य विश्राम एकंबे, आणि सदस्य, एम. राजीवन यांनी या दिनी शहीद झालेल्या जवानांविषयी व त्यांच्या परिवाराविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष सीकेटी कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ.एस. के. पाटील यांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली व नॅशनल कॅडेटस् कौरच्या कॅडेट्सना आपले कर्तव्य व जबाबदारी पालन करण्याविषयी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम रोटरॅक्ट क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी एकूण ७३ कॅडेट्स सहभागी झाले होते.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, रमाकांत नवघरे, ग्रंथपाल आणि कॅडेटस् यांनी अथक परिश्रम केले.

हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

दरम्यान, विद्यार्थ्यांना देशासाठी बलिदान देणाऱ्या व्यक्ती, पोलीस, सैनिक अशा व्यक्तींचा प्रेरणादायी जीवनप्रवास समजावा यासाठी सीकेटी महाविद्यालयात अशा व्यक्तींच्या स्मृतींना उजाळा दिला जातो.

## संपादकीय

# युद्धाची तयारी!

लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष २६ जागा लढवेल आणि शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे सहकारी पक्ष उर्वरित २२ जागा लढवतील असे अलीकडेच एका इंग्रजी दैनिकातील वृत्तात सूचित करण्यात आले, परंतु जागावाटप ठरलेले नाही. आमच्या वाटाघाटी सुरू आहेत असा खुलासा फडणवीस यांनी लागलीच केला. एकंदर वृत्तांकनांमधून निवडणुकीचे पडघम ऐकू येऊ लागले आहेत.

**लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखादेखील अजुन जाहीर झालेल्या नाहीत. तरीदेखील एप्रिल-मेच्या सुमारास देशभरामध्ये निवडणुकीची धामधुम सुरू असेल असा जाणकारांचा अंदाज आहे. महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका तसेच महानगरपालिकांच्या निवडणुका पाठोपाठच होतील असे दिसते. निवडणुका हा भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. आपल्या प्रचंड मोठ्या देशात कुठे ना कुठे निवडणुकीचे पडघम वाजत असतातच. सध्या तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि मिझोराम या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. तेलंगणामध्ये गुरुवारी मतदान पार पडणार आहे, तेथील निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा मात्र महाराष्ट्रात पोहचला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील १४ गावांमधील ३६०२ मतदार तेलंगणा विधानसभेसाठी मतदान करणार आहेत. कारण ही गावे महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन्ही राज्यांच्या सवलतींचा लाभ घेतात. चंद्रपूर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर ही १४ गावे वसली आहेत. ही १४ गावे आमचीच असा दावा महाराष्ट्र आणि तेलंगणा सरकार नेहमीच करत असतात. या गावांतील नागरिकांकडे दोन्ही राज्यांतील आधारकार्ड आणि मतदार ओळखपत्र बघायला मिळतील. अर्थात यातील गमतीचा भाग सोडला तर महाराष्ट्रातही निवडणुकांची तयारी हळूहळू का होईना जोर धरू लागल्याची चिन्हे आता दिसायला लागली आहेत. एका इंग्रजी दैनिकाने काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विस्तृत मुलाखत प्रसिद्ध केली. या मुलाखतीसोबत संबंधित दैनिकाने महायुतीचे जागावाटप देखील जाहीर करून टाकले. अर्थात फडणवीस यांच्या मुलाखतीत तसा उल्लेखही नव्हता, परंतु लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष २६ जागा लढवेल आणि शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे सहकारी पक्ष उर्वरित २२ जागा लढवतील असे त्या वृत्तात सूचित करण्यात आले होते. देवेंद्र फडणवीस यांचा लौकिक परिपक्व राजकारणी असा आहे. निष्कारण पुड्या सोडण्याचे राजकारण ते करत नाहीत, परंतु हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर माध्यमविश्वामध्ये खळबळ उडणे साहजिक होते. लोकसभेच्या निवडणुकांची तयारी सुरू झाल्याचा हा इशाराच मानला गेला. भारतीय जनता पक्ष हा शिस्तीने बांधलेला निष्ठावंतांचा पक्ष आहे. परस्पर दावे करून खळबळ माजवणे हे या पक्षाच्या शिस्तीत बसत नाही. फडणवीस हे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून तावून-सुलाखून बाहेर निघालेले प्रगल्भ नेते आहेत. अशाप्रकारचे जागावाटप अद्याप ठरलेले नाही. अजुनही आमच्या वाटाघाटी सुरू आहेत असा खुलासा त्यांनी लागलीच केला. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांना केवढा तरी आधार वाटला असेल. फडणवीस यांनी लोकसभा निवडणूक लढवून दिल्लीला जावे यासाठी त्यांचे विरोधकदेखील प्रार्थना करत असतात, परंतु आपण ठरलेल्या मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवणार आहोत हे देखील फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. येत्या काही दिवसांतच लोकसभेच्या निवडणुकांसाठी राज्यातील वातावरण तापू लागेल. ४८ पैकी ४२ जागा जिंकण्याचा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.**

# पनवेल रेल्वे स्टेशनजवळून मेट्रो हवी

**खबरबात**
**नितीन देशमुख**




पनवेलमध्ये उपनगरीय रेल्वे १९९६मध्ये सुरू झाली. पनवेल शहराचा विकास होत असताना रेल्वेमुळे झपाट्याने आजूबाजूच्या परिसराचे नागरीकरण होत आहे. आज या स्थानकातून वर्षभरात जवळपास ५० कोटी प्रवासी प्रवास करीत असल्याने लवकरच या स्थानकाचा समावेश 'अ १' श्रेणीत होणार आहे. पनवेल स्टेशनमध्ये प्रवाशांना पुरेशा मूलभूत सुविधांपासून तर वंचित ठेवण्यात आले आहेच, पण भविष्यात उपयोगी पडणाऱ्या मेट्रोने पनवेल रेल्वे स्टेशन जोडण्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे.


पनवेल रेल्वे स्टेशनला हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावरुन लोकल वाहतूक सुरू असते. दिव्याहून येणाऱ्या लाईनवरून मेल, एक्सप्रेस आणि मालगाडीची वाहतूक सुरू असते. मध्य रेल्वेच्या या स्टेशनच्या फलाट क्रमांक १ ते ३ वरून रोज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्स, ठाणे आणि अंधेरी अशा तीनशेपेक्षा जास्त लोकलच्या फेऱ्या होतात. याशिवाय फलाट क्रमांक ५ ते ७ वरून मेल व एक्सप्रेसच्या नियमित ५७ आणि होलीडे एक्सप्रेस गाड्या जातात. हार्बर व दिवा हे मार्ग जोडल्यास भविष्यात कोणतीही अडचण आल्यास त्याचा फायदा होऊ शकला असता, पण एक किमी. लुपच्या या कामाकडे रेल्वेने कायम दुर्लक्ष केले आहे. ते काम पूर्ण झाल्यास प्रवासाचा वेळ ही वाचू शकतो. आता ते होण्याची शक्यता ही दिसत नाही कारण नवीन सुरू असलेल्या कामात अनेक वेळा बदल करताना डबल डेकर लाईनला अडथळा होईल म्हणून त्याचा विचार केला जाणार नसल्याचे समजते. त्यामुळे ते आता एक स्वप्नच ठरणार आहे.

नैना प्रोजेक्टमुळे पनवेलचे महत्त्व वाढले आहे. पनवेलचा नागरिकरण वाढीचा वेग प्रचंड आहे. पनवेलच्या पूर्वेला म्हणजेच नवीन पनवेल बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीवस्ती वाढली आहे.पनवेल रेल्वे स्टेशनवर मालधक्का येथे नवीन फलाट बांधण्यात आला असून पूर्वीचे ३ व ४ फलाट बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे क्रमांक १ ते ३ फलाटावर लोकल गाड्या तर क्रमांक ५ ते ७ वर मेल आणि एक्स्प्रेस गाड्या येत असतात. पनवेल शहराचा मोठ्या प्रमाणात विकास हा नवीन पनवेल बाजूला झाला आहे. या बाजूला मोठ्या प्रमाणात रहिवासी वसाहती व इंजिनियरिंग व इतर महाविद्यालये असल्याने रोज येथे लाखो प्रवाशांची वर्दळ असते. आज देशात सगळीकडे मेट्रोचे जाळे तयार होत असताना. पनवेलसारख्या शहराच्या रेल्वे स्टेशनला मात्र मेट्रोने जोडण्यात आलेले नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

पनवेल स्टेशनचा विकास करताना ही माल वाहतुकीचे स्टेशन म्हणूनच रेल्वेने त्याचे आराखडे बनवले. हे मिटिंगला जाऊन अधिकाऱ्यांना हारतुरे देऊन खुश करणाऱ्या पनवेल प्रवासी संघटनेच्या बुजूर्गांच्या लक्षातच आले नाही. रेल्वेच्या एका नवीन आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला महाराष्ट्रातील पनवेल स्टेशनवर मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत हे पाहून नवल वाटले म्हणून इथे एव्हढी कामे का केली जात आहेत हे पाहण्यासाठी वरिष्ठ अधिकारी पनवेलला आले तेव्हा येथील पाहणी केल्यावर एवढ्या महत्वाचे रेल्वे स्टेशन मेट्रोने का जोडलेले नाही असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यावेळी येथे मुख्यत: मालगाड्यांच्यासाठी सोय करण्यात येत असल्याचे समजले. नवी मुंबई विमानतळ येथून १५ किमीपेक्षा कमी अंतरावर असल्याचे समजल्यावर त्याने अधिकाऱ्यांना तुम्ही प्लॅनमध्ये रेल्वे मंत्रालयाकडे मेट्रोची मागणी का केली नाहीत. रेल्वे मंत्रालयाकडे नाही तर आमच्याकडे केली असती तरी आम्ही त्याचा पाठपुरावा केला असता असे सांगितल्याचे समजते.

पनवेल महापालिका हद्दीत बेलापूरपासून तळोजापर्यंतच्या मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील बेलापूर ते पेंधर मार्गावर या महिन्यात मेट्रो सुरू झाली. त्यामुळे त्या परिसरातील लाखो लोकांना त्याचा फायदा मिळत आहे. पनवेल ते नवी मुंबई विमानतळाला जोडणाऱ्या मार्गावर पनवेल स्टेशनच्या पश्चिमेकडून जेएनपीटीला जाणाऱ्या मालगाडीच्या मार्गाच्या बाजून मेट्रो सुरू झाली, तर त्याचा फायदा सिडको वसाहती व अनेक गावांना होईल.

# बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर



गोपीनाथ गणेश तळवलकर हे मुलांच्या आनंद मासिकाचे संपादक व एक ख्यातनाम बालसाहित्यिक होते. प्रौढ साक्षरांसाठीही त्यांनी लिखाण केले. कणिका, खंडकाव्य, बालकविता असे विविध काव्यप्रकार हाताळूनही त्यांचे नाव झाले नाही. आकाशमंदिर, छायाप्रकाश, नंदिता या कादंबऱ्या, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व हे रसग्रहण, तसेच मुलांसाठीची अनेक पुस्तके त्यांनी लिहिली होती. काही लिखाण 'गोपीनाथ' या टोपणनावाने केलेले आहे. आज त्यांचा जन्मदिन आहे.

आकाशवाणीवरील बालप्रिय बालोद्यान या कार्यक्रमातील नाना म्हणजेच गोपीनाथ तळवलकर. तळवलकर हे पुणे केंद्रावर बालविभागप्रमुख होते. बालोद्यान हा मुलांचा कार्यक्रम ते आयोजत. दर रविवारी सकाळी दहा वाजता बालगोपाळांच्या गच्च उपस्थितीत हा कार्यक्रम होत असे. यास स्टुडियोचे दार जेमतेम बंद करता येण्याइतकी गर्दी होत असत.

आनंद हे मासिक १९०६ साली वासुदेव गोविंद आपटे यांनी सुरू केले, आपट्यांनंतर गोपीनाथ तळवलकर व नंतर संपादिका श्यामला शिरोळकर यांच्या संपादकत्वाखाली या मासिकाची वाटचाल चालू राहिली. गोपीनाथ तळवलकर हे ३५ वर्षे या मासिकाचे संपादक होते.

**निवडक पुस्तके**

अनुराधा, आकाशमंदिर (कादंबरी), आनंदभुवन, आशियाचे धर्मदीप, चंदाराणी (बालसाहित्य), छायाप्रकाश (कादंबरी), तव चरणी ही अञ्जली, दुर्वांकुर, नंदिता (कादंबरी), मराठी शब्द रत्नाकर, लिंबोणीच्या झाडाखाली (बालसाहित्य), वसंत सेवा, शांतिनिकेतन, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व (रसग्रहणात्मक पुस्तक)आत्मचरित्र सहस्रधारा : या आत्मचरित्रात आत्मगौरव, आत्मसमर्थन, अहंकार यांचा स्पर्शही नाही. या सहस्रधारा लेखकाच्या ऋजू व्यक्तिमत्त्वासारख्याच सौम्य, शीतल प्रवाहाने नटलेल्या आहेत.

कणिका, खंडकाव्य, बालकविता असे विविध काव्यप्रकार हाताळूनही त्यांचे नाव झाले नाही. आकाशमंदिर, छायाप्रकाश, नंदिता या कादंबऱ्या, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व हे रसग्रहण, तसेच मुलांसाठीची अनेक पुस्तके त्यांनी लिहिली होती. त्यांचे काही लिखाण 'गोपीनाथ' या टोपणनावाने केलेले आहे. आनंद मासिकाचे ते संपादक होते. तळवलकर हे पुणे केंद्रावर बालविभागप्रमुख होते. त्यांचे ७ जून २००० रोजी निधन झाले.

**(साभार : विकिपिडीया व बाईट्स ऑफ इंडिया )**

## बदलते तंत्रज्ञान



# व्हॉट्सअॅपमध्ये आता फक्त चॅटमध्ये प्रोफाइलची माहिती

व्हॉट्सअॅप हे सर्वांत प्रसिद्ध मेसेजिंग अॅप आहे. व्हॉट्स अॅप आपल्या वापरकर्त्यांना नेहमी नवीन फिचर देत असते. आता व्हॉट्सअॅप एका फीचरवर काम करत आहे,



याच्या मदतीने यूजरच्या प्रोफाईलशी संबंधित माहिती चॅट विंडोमध्येच दिसेल. जेव्हा कोणत्याही नंबरवरून आपल्याला मेसेज मिळतो, तेव्हा त्याची प्रोफाइल माहिती चॅट माहितीमध्ये न जाता पाहिली जाऊ शकते.

अनोळखी संपर्कातून मेसेज आल्यावर व्हॉट्सअॅप वापरकर्त्यांसाठी हे नवीन फीचर फायदेशीर ठरणार आहे. यानंतर, चॅट उघडण्याव्यतिरिक्त, वापरकर्त्यांना चॅट माहिती पेजवर जावे लागेल. येथे युजरचा प्रोफाईल फोटो, नाव आणि स्टेटस यांसारखी माहिती दाखवली जाते. आता ही माहिती पाहण्यासाठी तुम्हाला चॅट इन्फो पेजवर जाण्याची गरज नाही. चॅट विंडो ओपन होताच प्रोफाइलशी संबंधित माहिती आता वरच्या बाजूला दिसेल.


हे नवीन फीचर अँड्रॉइड व्हर्जन २.२३.२५.११ अपडेटसाठी व्हॉट्सअॅप बीटाचा एक भाग बनवण्यात आले आहे, जे Google Play Store वर उपलब्ध आहे. नवीन बदलासह, संभाषणाचा भाग म्हणून मेसेजिंग अॅपमधील प्रोफाइल माहिती चॅटिंग विंडोमध्ये दृश्यमान होईल. युजर्सचा फीडबॅक घेतल्यानंतर या फीचरचा अॅपमध्ये समावेश करण्यात येत असल्याचे समोर आले आहे.

एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, अनेक वापरकर्त्यांनी मागणी केली होती की वापरकर्त्याच्या प्रोफाइलशी संबंधित मूलभूत माहिती संभाषणांमध्येच दर्शविली जावी आणि मेटाच्या मालकीच्या अॅपने या आधारावर एक नवीन बदल केला आहे. प्रोफाईल माहितीच्या मदतीने एखाद्या संपर्काशी बोलायचे की नाही हे सहज ठरवता येते. आता यासाठी वेगळे स्टेप्स फॉलो करण्याची गरज नाही. लवकरच सर्व युजर्सना या बदलाचा लाभ मिळण्यास सुरुवात होईल.

नवीन फीचरचा आणखी एक फायदा म्हणजे नाव किंवा स्टेटस यासारख्या प्रोफाईल माहितीमध्ये वापरकर्त्याने केलेले बदल लगेच दिसून येतील. सध्या, हे बदल चॅट माहिती पेजला भेट दिल्यानंतरच दिसत आहे आणि तसे न केल्यास, ते बऱ्याच काळासाठी दृश्यमान होणार नाहीत. प्लॅटफॉर्म व्हॉट्सअॅप चॅनेल मालकांसह नवीन फिटरची चाचणीदेखील करत आहे आणि त्यांना निलंबित चॅनेलबद्दल चांगली माहिती देईल.

# उद्योगपती जे. आर. डी टाटा

**निमित्त**



२९ जुलै १९०४ रोजी पॅरिसमध्ये जन्मलेले जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा हे भारतात नागरी विमान सेवेचा पाया घालणारे पहिले द्रष्टे उद्योगपती, वैमानिक! त्यांचा आज स्मृतीदिन आहे. उद्योगपती रतनजी दादाभॉय टाटा हे त्यांचे वडील आणि त्यांच्या आईचे नाव होते सुझान ब्रीअरे. त्या फ्रेंच होत्या. रतनजी टाटा हे टाटा उद्योगसमूहाची स्थापना करणाऱ्या सर जमशेदजी टाटा यांचे चुलत बंधू होते. 'जेआरडी' यांची आई ही भारतात १९२९मध्ये कार चालवणारी पहिली महिला होती. जे. आर. डी. टाटा हे देशातील पहिले परवानाधारक वैमानिक होते.

टाटा उद्योगसमूहातील अनेक नव्या उद्योगांचा पाया 'जेआरडीं'नी घातला. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा मोटर्स, टायटन इंडस्ट्रीज, टाटा टी, व्होल्टास आणि देशातील पहिली विमान कंपनी एअर इंडिया यांचा समावेश आहे. फ्रान्स, लंडन, जपान आणि भारतात त्यांचे शिक्षण झाले. १९२५मध्ये त्यांनी 'टाटा सन्स'मध्ये बिनपगारी अॅप्रेंटिस म्हणून आपली कारकीर्द सुरू केली आणि १९३८मध्ये वयाच्या ३४व्या वर्षी ते 'टाटा सन्स'चे अध्यक्ष बनले होते. स्टील, रसायने, ऊर्जा, वीज, अभियांत्रिकी आणि आतिथ्यशीलता या क्षेत्रात त्यांना अधिक रस होता. त्यामुळे या क्षेत्रातील अनेक उद्योगांचा पाया त्यांनी घातला. उद्योगात मूल्य आणि तत्त्वे यांचा पाया बळकट करून त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा आदर्श जगासमोर उभा केला. टाटा म्हणजे विश्वासार्हता, हे समीकरण जनमानसात रुजवण्यात 'जेआरडीं'चे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली टाटा समूहाने आपली उलाढाल १०० दशलक्ष अमेरिकी डॉलरवरून पाच अब्ज डॉलर्सच्या पुढे नेली.

८८व्या वर्षापर्यंत कार्यरत असलेल्या 'जेआरडीं'च्या नेतृत्वाखाली टाटा समूहाच्या कंपन्यांची संख्या ९५ झाली होती. सर दोराबजी टाटा ट्रस्टचे ते अध्यक्ष होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९४१मध्ये टाटा मेमोरिअल सेंटर हे कर्करोगावर उपचार, संशोधन करणारे आशियातील पहिले रुग्णालय उभे राहिले. १९३६मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, १९४५मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि राष्ट्रीय सादरीकरण कला केंद्र या संस्थांची स्थापनाही 'जेआरडीं'नी केली. १९४५मध्ये टाटा मोटर्सची स्थापनाही त्यांनी केली. १९३२मध्ये त्यांनी टाटा एअरलाइन्स ही स्वतःची विमान कंपनी स्थापन केली. नंतर तिचे राष्ट्रीयीकरण करून ती एअर इंडिया झाली. 'जेआरडी' २५ वर्षे या कंपनीचे अध्यक्ष होते. देशात सर्वोत्तम हवाई वाहतूक सेवा देण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या योगदानाची दाखल घेऊन त्यांना मानद एअर कमोडोर पद देण्यात आले होते. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले होते.

१९५५मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. देशाच्या प्रगतीतील त्यांचे योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च मानाच्या नागरी पुरस्कारानेही त्यांना सन्मानित केले होते. या महान द्रष्ट्या उद्योजकाचा १९९३मध्ये वयाच्या ८९व्या वर्षी २९ नोव्हेंबर १९९३ रोजी जीनिव्हामध्ये मृत्यू झाला.

**(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : दिवाळी सणासाठी आलेल्या मच्छीमार बांधवांनी पुन्हा खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी आपल्या बोटी किनाऱ्यावर सज्ज करून ठेवल्या आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# टोमॅटोचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या...



बहुतेक लोकांना टोमॅटो खायला आवडतो. त्यात जेवणामध्ये टोमॅटोचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. टोमॅटो हा जेवणाची चव वाढवतो पण तुम्हाला माहिती आहे का, टोमॅटो जेवढा चविष्ट असतो तेवढा तो आपल्या शरीरासाठी गुणकारी असतो. त्यामुळे टोमॅटोचा सुपर फुडच्या यादीमध्ये समावेश आहे.

**वजन कमी होण्यास मदत –** टोमॅटो खाल्ल्यामुळे आपले वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. टोमॅटोमध्ये फायबर आणि पाण्याची मात्रा जास्त प्रमाणात असते त्यामुळे आपल्या शरीरात चरबी जमा होत नाही. तसेच टोमॅटो खाल्ल्यामुळे आपली पचन संस्थादेखील मजबूत होते. त्यामुळे वजन जर कमी करायचे असेल तर टोमॅटो जरूर खा. तसेच तुम्ही तुमच्या आहारात टोमॅटोच्या सूपचा देखील समावेश करू शकता.

**मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यास मदत –** मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी टोमॅटो हा खूप फायदेशीर ठरतो. टोमॅटो खाल्ल्यामुळे रक्तातील शुगरची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. कारण टोमॅटोमध्ये विटामिन, कॅल्शियम, प्रोटीन, फायबर असे अनेक गुणधर्म असतात, जे आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतात. तर मधुमेह असलेल्या रुग्णांनी टोमॅटोचा समावेश त्यांच्या आहारात करणं खूप गरजेचे आहे. तसेच ते टोमॅटोचे सूप देखील पिऊ शकतात.

**स्किनसाठी फायदेशीर–** टोमॅटो आपल्या स्किनसाठी देखील खूप फायदेशीर असतो. तुम्ही फक्त टोमॅटो खाऊच नाही शकत तर तो तुम्ही तुमच्या चेहऱ्यावरदेखील लावू शकता. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील डाग, पिंपल्स कमी होण्यास मदत होते. तसेच जर तुम्हाला सनबर्न झालं असेल तर तुम्ही टोमॅटो आवर्जून खा. टॅनिंग कमी करण्यासाठी टोमॅटो फायदेशीर ठरतो. नैसर्गिकरित्या टोमॅटोचा वापर चेहऱ्यावरती क्लींजर म्हणून देखील केला जातो. टोमॅटोमुळे आपली आपली स्किन चमकदार होण्यास मदत होते.

**कॅन्सरचा धोका कमी होतो –** टोमॅटो खाल्ल्यामुळे कॅन्सरचा धोका कमी होतो. कारण टोमॅटोमध्ये लाइकोपीन असते जे एक कैरोटीनॉयड आहे. टोमॅटो कॅन्सरविरोधात किमो प्रिव्हेंटिव्ह प्रमाणे काम करतो. त्यामुळे टोमॅटोचा तुमच्या आहारात समावेश केल्यामुळे कॅन्सरचा धोका कमी होण्यास मदत होते.

# आंबा, पांढरा कांदा पीक अडचणीत

## रायगडात अवकाळी पावसामुळे दर्जा घसरण्याची भीती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपूर्वी जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या, तसेच ढगाळ वातावरणामुळे आंबा व पांढऱ्या कांद्याचे पीक अडचणीत सापडले आहे. त्यामुळे किडरोगांचा परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.




रायगड जिल्ह्यामध्ये आंब्याचे १२ हजार ५०० हेक्टर क्षेत्र उत्पादनक्षम आहे. अलिबाग, मुरूड, रोहा, श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आंब्याची लागवड केली जाते. २० हजारांहून अधिक शेतकरी भातशेतीला पूरक म्हणून आंब्याची लागवड करीत आहेत. अलिबागमधील पांढरा कांदा आकाराने मध्यम असून, चविष्ठ व औषधी मानला जातो. या कांद्यालाही मोठी मागणी असते. अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहुली, बामणगाव व रामराज परिसरात कांद्याची लागवड केली जाते.

कार्ले परिसरात प्रत्येक घरातील शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करीत आहेत. रोहा तालुक्यातील खांब व देवकान्हे या गावांमध्येही काही प्रमाणात कांद्याची लागवड होत आहे. कांद्यापासून सुमारे एकरी सहा टन, तर हेक्टरी १५ टन उत्पादन मिळते. यातून सुमारे तीन कोटींची उलाढाल होते. कांदा लागवडीपासून दीड हजार शेतकऱ्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो.

गेल्या अनेक दिवसांपासून थंडी सुरू झाली आहे. त्यामुळे काही ठिकाणी आंब्याला मोहोर येण्यास सुरुवात झाली आहे. भातकापणीची कामे संपल्यावर पांढऱ्या कांद्याच्या लागवडीला सुरुवात झाली आहे, मात्र दोन दिवसांपूर्वी अचानक वातावरणात बदल होऊन, पाऊस पडला. त्याचा परिणाम आंबा व पांढरा कांदा पिकावर होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

पावसामुळे कांद्याला बुरशी लागण्याची भीती आहे. आंब्याच्या मोहोरावरही परिणाम होऊन तुडतुड्या व अन्य कीडरोगांचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे.



# माजगावात काकडा आरतीची सांगता

**खोपोली** : कोजागिरी पौर्णिमेला सुरुवात झालेल्या माजगाव येथील काकडा आरतीची राजेश महाराज सावंत–खांबेवाडी (उंबरे) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. महिनाभर विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये पहाटे चार ते सहा वा. पर्यंत काकडा आरती होत होती.

माजगाव येथील बहुसंख्येने ग्रामस्थ वारकरी सांप्रदायातील आहेत. कोजागिरी पौर्णिमेपासून रोज येथील विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये नित्यनेमाने काकडा आरती सुरू होती. काकडा आरतीच्या समाप्तीला महाप्रसाद ग्रामस्थ मंडळाच्या माध्यमातून देण्यात आला, तसेच कीर्तनरूपी सेवेचे सौजन्य ग्रुप ग्रामपंचायत माजगावच्या नवनिर्वाचित सरपंच दीपाली नरेश पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.


**महावितरण** — **निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रे यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी एक वर्षाच्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिका प्रविष्ट (Empanelment) करणेसाठी रिफ्लोट ई-निविदा क्रमांक टी-०९, टी-१०, टी-११ एकूण ३ निविदा महावितरण कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २९.११.२०२३ ते ०५.१२.२०२३ (रात्री ११.५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०५.१२.२०२३ ला रात्री ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/ शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**



**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग**

**मुख्य कार्यालय :- आदर्श भवन, श्रीबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.**

–: विशेष साधारण सभेची सूचना :–

(फक्त सभासदांसाठी)

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय, ''आदर्श भवन'', श्रीबाग नं. ३, ता.अलिबाग, जि. रायगड येथील तीसऱ्या मजल्यावरील सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. अभिजीत सुरेश पाटील यांचे अध्यक्षते खाली खालील विषयावर कामकाज करण्यासाठी आयोजीत केली आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

–: सभेपुढील विषय :–

विषय क्र. १ :– रामराज शाखेसाठी रामराज येथे बिनशेती प्लॉट खरेदी करणे करीता मंजूरी घेणे बाबत.

**दि. २८.११.२०२३**

**सही/–**
**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**मिनाक्षी शामसुंदर पाटील**
**कार्यलक्षी संचालिका,**

विशेष सूचना :– वरील सभेस सकाळी ठिक ११.०० वाजता आवश्यक ती गणसंख्या पूर्ण झाली नाही तर ही सभा तहकूब केली जाईल, सदर तहकूब सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठिक ११.३० वाजता सुरु होईल, त्यावेळी गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.


# राजिप वाघ्रण शाळा झाली डिजिटल!

## रुरल ॲण्ड यंग फाउंडेशनकडून संगणक भेट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघ्रण शाळा रुरल अँड यंग फाउंडेशनच्या माध्यमातून डिजिटल प्रशिक्षण वर्गाची निर्मिती करण्यात आली आहे. शाळेसाठी एक संगणक, एक लॅपटॉप आणि टीव्ही संच भेट देण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन शनिवारी (दि. २५) करण्यात आले.

या वेळी सरपंच राजेंद्र पाटील, सदस्य अक्षदा म्हात्रे, शाळा केंद्रप्रमुख श्याम पाटील, वाचनालय अध्यक्ष उदय पाटील, डॉ. कृष्णकांत पाटील, सेवाश्रम सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दीपक यशवंत पाटील, शाळा समिती पदाधिकारी वैभव पाटील, रुपेश पाटील, दयानंद म्हात्रे, पोलीस पाटील सोनल पाटील, श्रीकांत म्हात्रे, चित्रकार प्रथमेश म्हात्रे, सचिन पाटील, पालक शाळा समिती सदस्य, विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात अनिल रमाकांत पाटील वाचनालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या हस्ताक्षर लेखन स्पर्धेतील विजेत्या सुयोग गावंड, भाव्या म्हात्रे व नव्या पाटील, तर किल्ले स्पर्धेतील विजेते सार्थक गावंड, पर्व पाटील आणि पर्णवी पाटील यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.




**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my clients have purchased **549.60 Sq.mtrs. of plot of land bearing no. Plot No. A-3, Sector 16, Ulwe Node from 1. Mr. Chandrakant Changu Thakur, 2. Mr. Eknath Changu Thakur, 3. Mr. Lahu Changu Thakur, 4. Smt Sunita Shankar Thakur, 5. Mr. Ramesh Shankar Thakur & 6. Mr. Umesh Shankar Thakur** the said plot is allotted to them under 12.5% Scheme of CIDCO Ltd.

**SCHEDULE OF PLOT**

| Village Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| ULWE | A-3 | 16 | 549.60Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said property by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction /sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

Date –28/11/2023
Place - Panvel

**sign/-**
**Pankaj V. Mandhare**
**Advocate**
UL-2/11, 702, 7th Floor, Sector 19A,
Unnati, Ulwe, Panvel 410206
Mob. - 9702416111
adv.pankajmandhare@gmail.com



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना क्र. ७**

**ई निविदा सूचना क्र. ५९/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १३/०९/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक खबरें आज तक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमिकल, न्यू केमिकल झोन व एल, एम, व्ही आणि टी ब्लॉकमध्ये आरसीसी बिल्टअप गटर्ससह सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे. |

सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/१२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.


# मुरूडमध्ये सी–गल पक्षाला जीवदान

**मुरूड** : नांदगाव येथील समुद्राकिनारी शेकडो सी–गल पक्षी दाखल झाले होते. त्यापैकी एक पक्षी जाळ्यात अडकल्याचे दिसल्याने जितू दिवेकर यांनी त्याला वाचवून जीवदान दिले.

नांदगावचे रहिवासी जितू दिवेकर हे समुद्रकिनारी रोजच्याप्रमाणे फेरफटका मारत असताना त्यांना सी–गल पक्षी जाळ्यात अडकलेला दिसला. तो पक्षी जाळ्यातून बाहेर पडण्याकरिता प्रयत्न करीत होता, परंतु त्याला बाहेर पडता येत नव्हते. जितू दिवेकर यांनी पक्षाजवळ जाऊन जाळीतून त्याला सुखरूप बाहेर काढले, परंतु त्याला उडता येत नसल्याने प्राणीमित्र संदिप घरत यांना याबाबत माहिती दिली.

संदीप घरत यांनी सी–गल पक्षाला पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पवार यांच्याकडे तपासणीकरिता नेले. डॉक्टरांनी त्या पक्षावर तातडीने उपचार केले. त्यानंतर घरत यांनी समुद्रकिनारी सीगल पक्षाच्या कळपात सोडण्यात आले.




**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत मे. सानंद इंडस्ट्रीयल पार्क प्रा. लि. तर्फे श्री. पवन मुरारका प्रस्ताविक जमीन मालक यशवंत उर्फ शरद आत्माराम आटवणे या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्कावावत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पनवेल, तालुका पनवेल जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | गट नं. / हि.न. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार |
|---|---|---|---|
| पनवेल | १०२ / अ | १–५०–३३<br>पो. ख ०–०१–०६<br>एकुण १–५१–३९ | ६.२८ |

वरील मिळकतीपैकी प्रथमपक्षकार यांच्या मालकीचे व नावे असलेले ०–१२–३६, पो ख ० ०१–०६ एकुण ०–१३–४२ हे. आर. पॉ मिळकतीचे सदर खरेदी खत.

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहे असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– २९/११/२०२३**

**सही/–**
**मे. सानंद इंडस्ट्रीयल पार्क प्रा. लि.**
**तर्फे श्री. पवन मुरारका**
**मो. नं. ९४२६०८७७७७**



**MAHATRANSCO** — **EXTENSION TO E –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFxNo: -7000029123 Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-53/2023-2024.** Extension to RFx e-tender for AMC for various regular preventative maintenance/emergency and breakdown works of various 220kV & 100kV Substations under EHV O&M Dn. Panvel. **Tender amount Limited to Rs. 20,00,000/-,EMD amount Rs. 20,000/-.** |
| 2. | Online Downloading theRFx . | **29.11.2023, 18:00 Hrs. to 06.12.2023, 23:59Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 06.12.2023 up to 23:59 Hrs.** |
| 3. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **07.12.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN PANVEL**



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ९१ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | म्हासळा मांदाड रस्ता रा.मा. ९६ कि.मी. १५/१०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | ९३७०२२० | ९४००० | ११८०/– | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | मौजे पन्हाळघर झोरेवाडी येथील रस्ता ग्रा.मा. १९९ तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४८०९३७० | ४९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ३ | मौजे पळसगांव मुळगांव जोडरस्ता ग्रा.मा. १८१ तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४७९००२८ | ४८००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ४ | मौजे खर्डी नेराव सुतारवाडी उडदेवाडी ग्रा.मा. १९८ रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४००७७३२ | ४१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ५ | कडापूर रस्ता ग्रा.मा. १०७ कि.मी. १/८०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४०३७५८८ | ४१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | हरवंदी बाकी रस्ता ग्रा.मा. २४२ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ३२४०६२५ | ३३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | रा.मा. १७ ते पहेल ग्रा.मा. ४४ येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २४०००६६ | २५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | मोजे आंबर्ले कातळाचा कोंड ग्रा.मा. १०२ येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २०१३०१० | २१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | होडगांव कुभांरवाडी साळवे रस्ता ग्रा.मा. ५१ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २०२४९०५ | २१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | गंगवली कुभळवणे रस्ता ग्रा.मा. ५२ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २०२५२७१ | २१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | बोरमाच ते कुभांळमाच रस्ता ग्रा.मा. २०२ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ३२३०७७० | ३३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १२ | जिते कडापे रस्ता ग्रा.जि.मा ६१ कि.मी. ७/४०० ते ८/००० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २५३४३९८ | २६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | मौजे कुर्भे रस्ता ग्रा.मा. ११६ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड, | २४२४६२० | २५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १४ | हरवंदी चाणत रस्ता ग्रा.मा. ७० मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २०२४५०३ | २१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १५ | मल्याचीवाडी रस्ता ग्रा. मा. ६९ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६२४१७१ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १६ | मौजे येरद आदिवासीवाडी रस्ता ग्रा.मा. १३९ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६२११५४ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १७ | कोस्ते खुर्द रस्ता ग्रा. मा. ५६ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६१५८११ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १८ | मौजे साकळेवाडी रस्ता ग्रा.मा. १९४ मध्ये सुधारणा करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२२००९४ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा अ व वरील |
| १९ | माघरूळ बौध्दावाडी येथे रस्ता तयार करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२२३०३२ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा अ व वरील |
| २० | नांदवी रोहिदासवाडी येथे सामाजिक सभागृह बाधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२२३९६३ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा अ व वरील |
| २१ | आंबर्ले बौध्दावाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड, | १२२४२६६ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२९/११/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०६/१२/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **०८/१२/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/**
**दिनांक : २३/११/२०२३**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# स्वच्छतेसाठी नवी मुंबईकर धावले

## हाफ मॅरेथॉनमध्ये हजारो नागरिकांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या स्वच्छताविषयक कार्याला सहकार्य करण्याच्या व प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेतून लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये साडेचार हजारहून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत ही मॅरेथॉन यशस्वी केली.

नवी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, क्रीडा विभागाच्या उपायुक्त ललिता बाबर, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व अभिलाषा म्हात्रे यांनी याप्रसंगी उपस्थित राहून सहभागी धावपटूंना प्रोत्साहित केले.

नवी मुंबई महापालिकेचे स्वच्छताकर्मी ज्या समर्पित भावनेने शहर स्वच्छतेसाठी अहोरात्र काम करतात त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत महापालिकेच्या स्वच्छता कार्याला सहकार्य म्हणून नवी मुंबईकर नागरिकांमध्ये कचऱ्याचे ३ प्रकारे वर्गीकरण करणे व कचऱ्याची विल्हेवाट याबाबत जनजागृती करण्यासाठी तसेच 'निश्चय केला, नंबर पहिला' हे महानगरपालिकेचे ध्येय साध्य करण्यासाठी या स्वच्छ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आल्याचे लेट्स सेलिब्रेट फिटनेस च्या संयोजक रिचा समित यांनी सांगितले.



**नवी मुंबई मनपा, लेट सेलिब्रेट संस्थेचा उपक्रम**

नवी मुंबई महपालिकेच्या स्वच्छता कार्याला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेने स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन सारखा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल नवी मुंबई महापालिकेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

सकाळी ५.३० वा. सुरू झालेल्या या 'स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन' मध्ये ५ किलोमीटरच्या मॅरेथॉनमधून अपोलो रुग्णालयाच्या कॅन्सर सेंटरने अंत थॅलेसेमियाचा या घोषवाक्यास अनुसरुन जनजागृती केली. आयडीबीआय बँकेने दहा किलोमीटर आणि २१ किलोमीटर स्वच्छता रन आयोजनात सहकार्य केले.

विशेष म्हणजे या मॅरेथॉनमध्ये २०० हून अधिक तृतीयपंथी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याशिवाय अडीचशेहून अधिक दिव्यांग व्यक्तींनी तसेच महाराष्ट्र राज्यस्तरीय अंध दिव्यांगांच्या कल्याणकारी संस्था सदस्यांनीही यामध्ये सहभागी होत आपली सामाजिक बांधिलकी प्रदर्शित केली. रोटरी क्लब नवी मुंबईचेही या आयोजनात सहकार्य लाभले.

प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. २१ किलोमीटर प्रमाणे १० किलोमीटर व ५ किलोमीटर अंतराच्या पुरुष व महिला गटातील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आयोजन सहकार्य करणाऱ्या संस्थांचा लेट्स सेलिब्रेट फिटनेसच्या वतीने सन्मान करण्यात आला तसेच त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्तेही पारितोषिके वितरित करण्यात आली.

# नवी मुंबई मेट्रोचे तिकिट मुंबईप्रमाणे करा



**प्रवाशांची मागणी**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबईत पहिल्या तीन किलोमीटरसाठी १० रुपये आणि तीन ते १२ किलोमीटर अंतराच्या मेट्रोप्रवासासाठी २० रुपये मोजावे लागतात. तर नवी मुंबईतील मेट्रोच्या पहिल्या दोन किलोमीटरसाठी १० रुपये आणि एक ते १० किलोमीटरचा प्रवास केल्यास ४० रुपये मोजावे लागतात. त्यामुळे मुंबई मेट्रोप्रमाणे नवी मुंबईकरांना किमान समान तिकीट भाडे आकारावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

नवी मुंबई मेट्रोतून १० दिवसांत लाखापार प्रवासी संख्या गेल्यानंतर सुद्धा प्रवाशांकडून तिकीट भाडे कमी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. महामेट्रो या कंपनीकडे मुंबई व नवी मुंबई मेट्रोचा कारभार चालविण्याचे काम दिले आहे. मुंबई आणि नवी मुंबईतील तिकीटभाड्यात दुप्पटीची तफावत असल्याने लवकर तिकीटदर कमी करण्याची मागणी रास्त असल्याचे प्रवाशांचे म्हणने आहे. तळोजा वसाहतीमधील रहिवाशांना या मेट्रो सेवेचा सर्वाधिक लाभ होत आहे. वाहतूक कोंडीत न अडकता अवघ्या काही मिनिटांत प्रवाशांना वातानुकूलीत डब्यांमधून थेट तळोजा ते बेलापूर असा प्रवास करता येतो.

या प्रवासाचे तिकीटदर कमी केल्यास अजूनही प्रवासी संख्या वाढेल अशी अपेक्षा आहे. सिडको मंडळाने दिवसाला तळोजा ते बेलापूर या पहिल्या टप्प्यातील मेट्रोमधून दिवसाला ९८ हजार प्रवासी लाभ घेतील असे अपेक्षित होते. यासाठी सिडको मंडळाने २९५४ कोटी १४ लाख रुपये खर्च करून ही मेट्रो सेवा सुरू केली. आतापर्यंत १० दिवसात प्रतिदिन २० हजार प्रवासीसंख्या नोंदविली गेली. सिडको मंडळाने ० ते १० किलोमीटरसाठी ४० रुपयांऐवजी २० रुपये भाडे आकारण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

# बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्यांवर सिडकोची कारवाई

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीवर अथवा भूखंडावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत आहे. अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रीकी विभाग, अनधिकृत बांधकामे विभागाच्या मार्फतीने सोमवारी (दि.२७) रात्री सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवून, पनवेल, तळोजा या ठिकाणी असलेल्या मोकळया जागेत अथवा रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे डेब्रीजचे डंपर खाली करीत असताना मिळून आलेले एकूण चार डंपर्सवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रीज टाकत असताना कोणी आढळल्यास सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेबसाईट वर तसेच संबंधित पोलीस ठाण्यात कळविण्यात यावे, असे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

# सीकेटी महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे संविधान दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाच्या तर्फे रविवारी (दि. २६) ७४ वा संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी नॅशनल कॅडेटस् कौरच्या कॅडेट्स सर्व प्रथम सी. एस. एम.मयुरी पिसाळने प्रतिज्ञा घेतली व त्यानंतर सी.क्यू.एम.एस. आदित्य घवे याने संविधानाच्या उद्देशिकेचे सर्वांकडून वाचन करून घेतले. तसेच कॅडेटस् प्रेम भोसले याने भारतीय संविधानाचा इतिहास, संविधानाचे महत्त्व, कॅडेटस् प्रतिज्ञा नाईक व कॅडेटस् सारण्या देवरे यांनी संविधानाची प्रस्तावना, कॅडेटस् मिनिष चोरगे ने संपूर्ण संविधानाचा सार कॅडेटस् समोर ठेवला.

असोसिएट एन.सी.सी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे यांनी कॅडेटस् ना भारतीय संविधानामधील भारतीय नागरिकांचे मैलिक अधिकार व त्यांची कर्तव्य समजावून सांगून मार्गदर्शन केले. तसेच भारतीय लोकशाहीचे तीन स्तंभ म्हणजे न्यायव्यवस्था, विधिमंडळ आणि कार्यपालिका याविषयी पण स्पष्टीकरण दिले. या कार्यक्रमासाठी एकूण ७३ एन. सी. सी. कॅडेट्सनी सहभाग घेतला.



या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के. पाटील, आय. क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, रमाकांत नवघरे, ग्रंथपाल आणि कॅडेटस् यांनी अथक परिश्रम केले.

हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# ज्ञानेश्वरी वाचली तरी जिभेवर साखर घोळेल -ए.के. शेख

## पारिजात साहित्य समूहाचे कविसंमेलन उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मराठी इतकी सुंदर भाषा जगात दूसरी नाही, ज्ञानेश्वरी वाचली तरी जिभेवर साखर घोळेल, असे प्रतिपादन ए. के. शेख यांनी केले. पारिजात साहित्य समूहाचे पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन रविवारी (दि.२६) सानपाडा येथे झाले. या वेळी ते बोलत होते.



या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी गझलचे व्यासपीठ असे संबोधले जाणारे ज्येष्ठ गझलकार ए. के. शेख होते. संमेलनाचे उद्घाटक महाराष्ट्र केमिस्ट असोसिएशनचे सचिव सुनील छाजेड, तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी कादंबरीकार राजश्री भावार्थी उपस्थित होत्या.

विशेष निमंत्रित अतिथी म्हणून गझलकार विजय जोशी, गझलकारा उर्मिला बांदिवडेकर, कवी बाळासाहेब तोरसकर, गझलकार साबीर बिराजदार, सिराज शिकलगार, मोहन जाधव, कवी अनंत जोशी, कवी दीपक पटेकर, लालित्य लेखिका कवयित्री भारती भाईक, कवयित्री फरझाना डांगे, कवयित्री डॉ. श्यामल पाटील अग्रवाल आदी उपस्थित होते. पारिजात साहित्य समूहाचे सर्वेसर्वा समूह प्रशासक प्रा. एस. यु. मुल्ला, शबाना मुल्ला या दांपत्यांच्या आयोजन व कठोर परिश्रम पारिजात काव्यसंमेलनाच्या यशस्वीतेत दिसून आले.

संमेलनाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते सुनील छाजेड यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. कवयित्री अर्चना देवधर लिखित विश्वप्रार्थना कवयित्री शबाना शेख यांनी गाऊन संमेलनाला सुरुवात झाली. उपस्थित सर्व मान्यवर, प्रमुख अतिथी, निमंत्रित अतिथी आदींचे स्वागत अध्यक्ष व आयोजकांनी केल्यानंतर शबाना शेख यांचा पहिला काव्यसंग्रह धुक्यातील दवबिंदू व राजश्री भावार्थी यांच्या शापित सौंदर्य या कादंबरीचे प्रकाशन संमेलनाचे अध्यक्ष ए. के. शेख व मान्यवरांच्या हस्ते झाले.

# पावसामुळे उरणच्या हवामानात सुधारणा

**उरण : रामप्रहर वृत्त**

दोन दिवसांच्या मुसळधार पावसाने उरणच्या हवामानात सुधारणा झाली आहे. गेल्या १५ दिवसांपूर्वी उरण तालुक्यात अतिशय वाईट हवेची उच्चांकी निर्देशांकाने गाठली होती. त्यात घट झाली असून उरणचा हवा गुणवत्ता निर्देशांक ३९ वर आला आहे. हवा प्रदूषण घटले आहे, त्यामुळे अनेक दिवसांनी शुद्ध हवेचा श्वास उरणच्या नागरिकांना घेता येत आहे.

सोमवारी अडीच वाजता मिळालेल्या आकडेवारी नुसार उरणच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३९ वर आला होता. त्याचप्रमाणे वातावरणातही बदल जाणवत होता. उरण तालुका आणि परिसरात मोठया प्रमाणात प्रदूषणात वाढ झाली आहे. येथील रस्ते, मातीची खोदकाम, दगड उत्खनन, दररोज जाळण्यात येणारा कचरा यामुळे धुळीकणात वाढ झाली होती. यामध्ये वाढत्या उष्णतेचीही भर पडत आहे.

रविवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार आणि सोमवारी दुपारी आलेल्या सरींमुळे वातावरणातील तापमानात घट झाली आहे. तर जोरदार पावसाने हवेतील धूलिकण नष्ट केल्याने हवेतील हा बदल जाणवू लागला आहे.

# 'गावागावात संविधान पारायण गरजेचे'



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गावागावात संविधान पारायण करून संविधान साक्षर करणे गरजचेचे असल्याचे मत डॉ. जी. के डोंगरगावकर यांनी व्यक्त केले. खारघर नवी मुंबई येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आणि व्याख्यानाचे आयोजन खारघरच्या शांताबाई रामराव सभागृहात डॉ. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. संविधान आणि नागरिकाचे कर्तव्य यावर माजी आयकर उपायुक्त अरविंद सोनटक्के यांचे व्याख्यान झाले.

भारतीय संविधानाची उद्देशिका हे देशातील प्रत्येक नागरिकाने प्रतिज्ञापुर्वक पालन करण्याची जबाबदारी आहे. संविधानाने धर्म स्वातंत्र्य सर्व नागरिकांना दिले आहे, मात्र संविधानाचे मुलभूत ढाचा आणि धर्मातील रुढी परंपरा ह्या संविधानापेक्षा श्रेष्ठ नाहीत. संविधान हे सर्वश्रेष्ठ आहे. संविधानाच्या कलम १३ नुसार २६ जानेवारी १९५० पूर्वी आणि संविधान लागु झाल्यापासून देशातील संविधानाच्या तत्वाशी विसंगत सर्व धर्माचे तत्वज्ञान निरसीत करण्यात आले आहे. संविधान विसंगत धार्मिक वर्तन ही गुन्हेगारी असून संविधानाच्या कर्तव्याचा भंग आहे. सरकारने अशा समूदायावर वेळीच कार्यवाही करावी, असे अरविंद सोनटक्के यांनी आपल्या व्याख्यानात म्हणाले. संविधानाला वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला नागरिक अपेक्षित आहे, असे सोनटक्के म्हणाले.

देशातील ८० टक्के नागरिक संविधान साक्षर नाही. संविधान सर्व अभ्यासक्रमात व सर्व स्तरावर लागू नाही. त्यामूळे संविधान विरोधी वर्तन भारतीय समाजात दिसून येत आहे. त्यासाठी गावोगावी आणि वस्त्यावस्त्यात संविधान पारायणाचे वर्ग चालू करणे आवश्यक असल्याचे डोंगरगावकर म्हणाले.

संविधान साक्षरतेसाठी संस्थेच्या वतीने नागोठणे, तळोजे, खारघर, सीबीडी–बेलापूर आणि डोंगरगाव जि. लातूर येथे २६ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत संविधान पारायणाचे आयोजन करण्यात आले असल्याचे डोंगरगावकर यांनी सांगितले.

संविधान दिनाच्या व्याख्यानानिमित्त झालेल्या कार्यक्रमाचे संचलन प्रा. संगिता जोगदंड यांनी केले भारताचे संविधान, शाल, पुष्पगुच्छ देऊन प्राचार्या वनिता सुर्यवंशी आणि प्रा. नेहा राणे यांनी स्वागत केले. प्रा. ललिता यशवंते यांनी आभार मानले. संविधानिक प्रस्ताविकेची शपथ घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ झाला आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सुजाण नागरिक घडवणाऱ्या संविधानाचे महत्त्व जाणून घेऊया –प्रा. कोल्हे

**नवी मुंबई : बातमीदार**

सुजाण नागरिक निर्माण करण्यामुळे लोकशाहीचा पाया मजबूत होतो हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला विचार लक्षात घेऊन संविधान साक्षरता वाढविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले गेले पाहिजेत असे सांगत प्रसिद्ध साहित्यिक, संविधान अभ्यासक अविनाश कोल्हे यांनी नवी मुंबई महापालिका सातत्याने विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करून जो वैचारिक जागर करीत आहे तो प्रशंसनीय व इतरांनी अनुकरण करावा असा असल्याचे मत व्यक्त केले.

'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजल्या जात असलेल्या ऐरोलीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिनाचे औचित्य साधून 'विचारवेध' या व्याख्याने शृंखले अंतर्गत 'भारतीय संविधान : इतिहास, वारसा आणि वैशिष्ट्ये' या विषयावर आयोजित व्याख्यानाप्रसंगी प्रा.अविनाश कोल्हे यांनी अतिशय सहज सोपी उदाहरणे देत संविधानाचा इतिहास आणि त्याचे महत्त्व उलगडून दाखविले.



भारतीय नागरिकांना आपले स्वातंत्र्य आणि जगण्याचे अधिकार व हक्क तसेच नागरिकांची कर्तव्य याचे स्पष्ट आणि सखोल मार्गदर्शन करणारी आपली राज्यघटना ही समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय व्यवस्था अशी मूलतत्त्वे स्पष्ट करते असे त्यांनी विविध उदाहरणे देत सांगितले.

इतर देशांच्या कायद्यांचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर आपली घटना निर्मिती करताना त्यात या देशाच्या मातीचा, सर्वसमावेशक अशा सर्वधर्मसमभावी संस्कृतीचा गंध व रंग असला पाहिजे हे बाबासाहेबांनी जाणले होते, त्यामुळे आपली राज्यघटना वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे प्रा. अविनाश कोल्हे म्हणाले.

संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही तर ती राज्यघटना आहे, कारण त्यात देश कसा चालेल, यासोबत कशासाठी चालेल, हे देखील उधृत केलेले आहे. त्यामुळे आपल्या विद्यमान राज्यघटनेचा विचार करताना त्यापूर्वी आपल्या देशात कोणकोणते कायदे होते याचाही बारकाईने ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास केला पाहिजे असे सांगत प्रा. अविनाश कोल्हे यांनी १७७३ मधील रेग्युलेटिंग अॅक्ट पासून १९४९ मधील राज्यघटना निर्मितीआधी त्या त्या काळात अस्तित्वात असलेल्या १८३३, १८९२, १९०९, १९१९, १९३५, १९४७ अशा विविध टप्प्यांवरील कायद्यांची सविस्तर उदाहरणे देत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शिक्षण विभागाचे उपायुक्त दत्तात्रय घनवट यांनी व्याख्याते अविनाश कोल्हे यांचे स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांनी नेटके सूत्रसंचालन केलेल्या या व्याख्यानाप्रसंगी प्रा. अविनाश कोल्हे यांनी स्मारक बघितल्यानंतर कल्पकतेने बांधलेली व सांभाळलेली देखणी स्मारक वास्तू पाहून मन प्रसन्न झाले असा अभिप्राय व्यक्त करीत प्रत्येकाने हे स्मारक पाहण्यासाठी अवश्य यावे असे आवाहन केले.

# प्रा. वाघमारे यांना पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**



सत्यशोधक राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३ साठी रबाळेच्या शाहू महाराज विध्यालाचे क्रीडा शिक्षक प्रा. अमोलकुमार वाघमारे यांची निवड समितीमार्फत एकमताने झाल्याचे पत्र सत्यशोधक प्रागतिक मंच व निर्मिती विचारमंचचे अध्यक्ष अनिल म्हमाने यांनी जाहीर केले.

पुरस्कार वितरण सोहळा महात्मा फुले पुण्यतिथी दिनी मंगळवारी राजर्षी शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे सायंकाळी ५ वा परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ सहित्यिक, विचारवंत यांच्या हस्ते झाला.

प्रा. अमोलकुमार वाघमारे हे मुळगाव कवठे महांकाळ जि. सांगलीचे रहिवाशी आहेत. त्यांनी विध्यार्थी दशेत असले पासून कला क्रीडा व समाजकार्यात स्वतःला झोकून दिले आहे शिवाजी विद्यापीठ विध्यार्थी मंडळवर त्यांना संचालक म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न तडीस नेले होते.

## निवडक

### डॉ. श्रीनिवास वाळिंबेंना 'जीवनगौरव'



**खोपोली** : चौक येथील डॉ. श्रीनिवास वाळिंबे यांना रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंते, व्यापारी धर्माशेट ओसवाल, ग्रंथपाल अभिजित चौधरी, रजनीकांत शहा, सतीश आंबावणे, मुरलीधर साखरे, मनोज साखरे, राजन चौधरी, अजिंक्य चौधरी, अशोक चौधरी, राजेश आंबवणे, जयश्री चोगले, ऐश्वर्या जोशी, डॉ. अपर्णा वाळिंबे आदी उपस्थित होते. वाचनालयाचे अध्यक्ष सुरेश वत्सराज यांनी, डॉ. श्रीनिवास वाळिंबे गेली ६० वर्षे रुग्णांची सेवा करीत आहेत. त्याचे चीज झाले असून त्यांस उत्तम फळ मिळाले. शिवाय या मोफत वाचनालयास त्यांचे मार्गदर्शन आम्हास वेळोवेळी लाभत आहे. त्यांना मिळालेला पुरस्कार म्हणजे त्यांनी केलेल्या उत्तम कामाचे स्वरुप आहे, असे सांगितले.

### 'त्रिपुरारी'निमित्त रायगडावर दीपोत्सव

**महाड** : त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त किल्ले रायगडावर दीपोत्सव साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ३५० मशालींनी आणि दिव्यांनी किल्ला उजळून निघाला. मावळा संघटना व शेकडो शिवप्रेमींच्या उपस्थितीत रायगडच्या पायथ्याशी चित्तदरवाजा व राजमाता जिजाऊ समाधी स्थळावर हा कार्यक्रम पार पडला. रायगडचा पायथा व पायऱ्या फुलांच्या माळांनी सजविण्यात आल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी किल्ला परिसर दुमदुमला होता. जिजाऊंच्या समाधीस्थळीही दीप प्रज्वलन करण्यात आले होते. 'उत्सव तेजाचा, जागर हिंदुत्वाचा' या संकल्पनेवर आधारित दीपोत्सव पार पडला.

# माणगावात कडधान्यांचे मोठे नुकसान

## नुकसानभरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**माणगाव** : **प्रतिनिधी**

तालुक्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या भातशेतीचे मधल्या काही दिवसात नुकसान झाले असतानाच आता शेतकऱ्यांनी पेरलेल्या कडधान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे या गरीब शेतकऱ्यांना लवकरात लवकर शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी धनंजय राईस मिलचे मालक तथा उद्योजक विजय मेथा यांनी केली आहे.

तालुक्यात सलग दोन दिवस अवकाळी पाऊस पडल्याने शेतकरी राजा चिंतातूर झाला आहे. या शेतकऱ्यांनी भातकापणीचा हंगाम संपल्यानंतर पेरलेल्या कडधान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

बहुतांश शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह हा त्यांच्या शेती व्यवसायावर चालत असतो. काही शेजारी आपल्या मालकी हक्काच्या शेतातून तसेच भाड्याने घेतलेल्या शेतातून दुबार भातशेती करीत असतो, तर काही शेतकरी पावसाळी भातशेतीची कापणी झाल्यावर आपल्या शेतातून कडधान्यांची पेरणी करीत असतात.

माणगाव तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी यावर्षी भातकापणीचा हंगाम संपल्यानंतर आवरा, पावटा, मूग, हरभरा, मटकी यांसारख्या कडधान्यांची पेरणी केली असून या कडधान्यांची रोपे मोठी झालेली असताना अवकाळी पडलेल्या पावसामुळे ही रोपे शेतात आडवी झाल्याने शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**अवकाळी पाऊस झाल्याने आम्ही आठ ते १० एकरामध्ये पेरलेली आवरा, मूग, हरभरा, मटकी यांसारख्या कडधान्यांचे नुकसान झाले असून माय-बाप सरकारने आम्हा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकर भरपाई देऊन आमचे अश्रू पुसावेत.**

**-दत्ताराम रामा तेटगुरे,**
**शेतकरी, साळवे, माणगाव**






**चौक : तळदेव गाव या कोयना प्रकल्पग्रस्त गावात काकडा आरती समाप्तीनिमित्त मुलगी वाचवा संदेश समाजाला देणारी रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.**

# बोर्लीत पूर्ववैमनस्यातून प्राणघातक हल्ला

### एकजण गंभीर जखमी; तिघांविरोधात गुन्हा

**रेवदंडा** : **प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बोर्ली नाका येथे पूर्ववैमनस्यातून दोन कुटूंबात शिवीगाळ, मारहाण झाली. यामध्ये मच्छीच्या सुऱ्याने एकावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बोर्ली गावातील मधला पाडा येथील दोन कुटूंबात पूर्वीपासून वाद आहेत. रोहीत चिरायू (रा. बोर्ली) व चुलत भाऊ रोश चिरायू हा शनिवारी (दि. २५) रात्री ८.१५ वा. चे सुमारास बोर्ली नाका येथे हॉटेलमध्ये मित्रांसह गेला असता, तेथे सुबोध जायपाटील व दिप्ती जायपाटील यांनी जुना वाद उकरून काढला. रोहित चिरायू यांनी हे भांडण सोडविले. रोश चिरायू घरी जाण्यास निघाला असता, सुबोध जायपाटील व दिप्ती जायपाटील यांनी त्याला अडवून शिविगाळ केली.


याबाबत रोश चिरायू यांनी रोहीत चिरायू यांस फोन करून सांगितल्याने रोहित चिरायू, रोश चिरायू यांचे वडील राजेंद्र चिरायू तेथे पोहचले. तेथे असलेला आर्य जायपाटील यांनी दिलेल्या लोखंडी रॉड व मच्छी कापण्याची सुरीने सुबोध जायपाटील व दिप्ती जायपाटील यांनी रोहीत चिरायू, राजेंद्र चिरायू व रोश चिरायू यांना लोखंडी रॉडने मारहाण केली.

आर्य जायपाटील यांनी हाताबुक्काने मारहाण केली, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे रोहित चिरायू यांनी दिली आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे रोहित चिरायू यांच्या तक्रारीनुसार सुबोध जायपाटील, दिप्ती जायपाटील व आर्य जायपाटील यांचेविरोधात भादंवि. कलम ३२४, ३४१, ३२३, ५०४, ३४प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस नाईक सुग्रिव अभिमान गव्हाणे हे करीत आहेत.

# खोपोली-पेणदरम्यान गर्डरचे काम पूर्ण

## द्रुतगती मार्गावरील वाहतूक तीन तासांसाठी वळवली



**खालापूर** : **प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर टोल नाक्याच्या काही अंतरावर खोपोली-पेण मार्गाचे काम सुरू असून या मार्गाचे रुंदीकरण करताना पुलाचे काम करण्यात आले.

या पुलावर गर्डर बसविण्यासाठी मंगळवारी (दि. २८) दुपारी १२ ते ३ या वेळेत दुरुस्ती व पुलावर गर्डर बसविण्यासाठी महामार्गावरील पुणे बाजूकडे जाणारी मार्गिका तीन तासांसाठी बंद करण्यात आली होती.

या वेळेत या ठिकाणी असणाऱ्या खोपोली पेण-अलिबाग पाली या मार्गावरील ब्रिजवर गर्डर बसविण्यात आले. यासाठी वाहतूक काही काळ थांबवण्यात आली होती, तर लहान वाहने अन्य मार्गाने वळविण्यात आली होती.

# बौद्ध समाज युवा संघातर्फे संविधान दिन उत्साहात



**पाली** : **प्रतिनिधी**

बौद्ध समाज युवा संघ रायगडच्या पुढाकाराने संविधान गौरवदिनाचा ७४वा वर्धापन दिन नागोठणे येथे सामाजिक कार्यकर्ते संतोष गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह येथील पटांगणात पार पडला. या वेळी विविध धार्मिक, वैचारिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. नागोठणे शहरातून संविधानाच्या प्रतिमेची रॅली काढण्यात आली.

प्रमुख वक्ते मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. किरण चन्ने व ॲड. आशिष इंगळे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला बहाल केलेल्या पवित्र राष्ट्रग्रंथ असलेल्या भारतीय संविधानाचे महत्व, आणि पैलू अभ्यासपूर्ण आणि सविस्तरपणे उलगडले.

या वेळी छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची हुबेहूब व्यक्तिरेखा साकारलेले कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. त्यानंतर कोकण नेते व्ही. के. जाधव यांचा कोकणरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास पूज्य भन्तेजी आदीचित्तो, विकास जाधव, संतोष गायकवाड, भगवान बिनेदार, शांताराम गायकवाड, बहुजन विद्यार्थी संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिल वाणी, स्वराज्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष दिपीका चिपळूणकर, बौद्ध समाज युवा संघ रायगडचे संस्थापक रमेश शिंदे, मराठा समाज अध्यक्ष आप्पा देशमुख, कोळी समाज अध्यक्ष धर्मा कोळी, उद्योजक स्वराज संजय सोनावणे, चंद्रकांत सोनावणे, चंद्रकांत अडसुळे, नागोठणे पोलीस निरीक्षक संदीप पोमन, पँथर सुशील जाधव, पँथर राहुल सोळंकी, विवेक सुभेकर, सुधाकर जवके, विलास कांबळे, जितेंद्र गायकवाड, विजय अडसुळे, अमित गायकवाड, देवेन कोळी, सचिन भालेराव, बौद्धचार्य किसन शिर्के, हिरामण मोते, बिलार कुरेशी, सूर्यकांत कांबळे, गोविंद शिद, राजेंद्र वाघमारे, काशिनाथ दाभाडे, दिलीप दाभाडे, दीपक दाभाडे, जिल्हाध्यक्ष राजश्री दाभाडे, संध्या जाधव, मंजुळा जाधव, मिनाक्षी तुपारे, सुविधा अहिरे, श्वेता मोहीते, वैशाली जाधव, योजना रणवीर, देवता भंडारी, दिपश्री घासे, माया डोंगरगावकर, सुनिता दाभाडे, पोर्णिमा दाभाडे, मंदा शिंदे, श्वेता कांबळे, हर्षदा खंडारे, संध्या गायकवाड, सुनिता बिनेदार, रोहिणी जाधव, निलम गायकवाड, स्वप्नाली कांबळे, ममता भगत, गुलाब शेलार, पुनम सावंत, अक्षता बिनेदार, आदी उपस्थित होते.


# त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त कर्जतकरांना रायगड दर्शन

**कर्जत** : **प्रतिनिधी**

त्रिपुरारी पौर्णमेनिमित्त शिवसेना कर्जत शहर व आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनच्या यांच्या माध्यमातून किल्ले रायगड दर्शन मोहिमेचे आयोजन नागरिकांसाठी करण्यात आले होते. या मोहिमेत तब्बल १००० कर्जतकर शिवप्रेमींनी सहभाग नोंदवला. या सर्व शिवप्रेमींनी किल्ले रायगड दर्शनासाठी आयोजकांकडून व्यवस्था करीत सर्वांना किल्ले रायगड दर्शन घडवण्यात आले.

किल्ले रायगड दर्शन मोहिमेचे आयोजन कर्जत नगर परिषदेचे नगरसेवक ॲड. संकेत भासे व शिवसेना कर्जत शहरप्रमुख अभिषेक सुर्वे यांनी इतिहास संशोधक व अभ्यासक सागर सुर्वे यांच्या सहकार्याने आयोजित केली होती. सर्व नागरिकांना नाष्टा, जेवण, पाणी, चहाची सोय आयोजकांनी केली, तसेच दोन रुग्णवाहिकेसोबत डॉक्टर आणि आरोग्य व्यवस्थादेखील सोबत सज्ज ठेवण्यात आली होती.

दरम्यान गडावर पोहचल्यावर सर्व शिवप्रेमींना येथील परिसर आणि ऐतिहासिक माहिती सागर सुर्वे यांनी दिली, तर आमदार महेंद्र थोरवे यांनी स्वतः उपस्थित राहत सर्व नागरिकांसोबत रायगड दर्शन केले.



# ...अन् त्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य!

## अलिबागमधील ११ आदिवासी कुटुंबांना मिळाली पक्की घरे

**अलिबाग** : **प्रतिनिधी**

वादळात घरे उद्ध्वस्त झालेल्या अलिबागमधील जलपाडा येथील आदिवासी कुटुंब गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन घरात रहायला गेली. मुंबईतील केसरदेव सिंघानिया ट्रस्टने ११ कुटुंबांना ही घरे बांधून दिली. माजी जिल्हा परिषद सदस्या मानसी दळवी आणि ट्रस्टचे विश्वस्त चंद्रप्रकाश सिंघानिया यांच्या हस्ते या घरांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. या वेळी आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू पाहायला मिळाले.



जलपाडा आदिवासीवर राहणाऱ्या कुटुंबांची घरे वेगवेगळ्या कारणांनी उद्ध्वस्त झाली होती. मोडक्या तोडक्या झोपडीत त्यांचा संसार सुरू होता. या कुटुंबांना कायमस्वरूपी पक्क्या घरांची गरज होती. ही बाब परहूरचे सरपंच प्रफुल्ल पाटील यांनी अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते अबिद उल्डे यांच्या कानावर घातली. त्यांनी मुंबईतील केसरदेव सिंघानिया ट्रस्टकडे यासंदर्भातील प्रस्ताव ठेवला. ट्रस्टचे विश्वस्त चंद्रप्रकाश सिंघानिया यांनी याला तत्काळ होकार दिला आणि कामाला सुरुवात केली. काही काळातच सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही जांभ्या दगडातील पक्क्या स्वरूपातील घरे उभी राहिली.

या वेळी बोलताना मानसी दळवी यांनी सिंघानिया ट्रस्टच्या उपक्रमाचे कौतुक केले. आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवते आहे. या सरकारच्या प्रयत्नांना सिंघानिया ट्रस्टसारख्या सेवाभावी संस्था हातभार लावतात ही बाब महत्त्वाची आहे. यापुढेही त्यांनी आपली समाजसेवा सुरू ठेवावी, अशी अपेक्षा दळवी यांनी व्यक्त केली.

सिंघानिया ट्रस्टचे विश्वस्त चंद्रप्रकाश सिंघानिया यांनीदेखील समाधान व्यक्त केले. गोरगरीब कुटुंबांसाठी काम करण्याची संधी अबिद उल्डे आणि प्रफुल्ल पाटील यांच्यामुळे मिळाली. आयुष्यात गोरगरीबांसाठी शक्य असेल तेवढे करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. या वेळी परहूरचे सरपंच प्रफुल्ल पाटील, उपसरपंच शशीकांत नाईक, सिंघानिया ट्रस्टचे आशीष सिंघानिया, सामाजिक कार्यकर्ते अबिद उल्डे, ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, आदिवासी वाडीवरील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणमध्ये स्वच्छता अभियानातून दोन टन कचरा गोळा

**पेण** : **रामप्रहर वृत्त**

शहरात सुशोभीकरणाबरोबरच स्वच्छतेलाही प्राधान्य द्यावे, अशा सूचना करण्यात आल्याने पेणमध्ये मुख्य रस्त्यावर रविवारी (दि. २६) स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या वेळी सुमारे दोन टन कचरा गोळा करण्यात आला.

नगर परिषदेचे मुख्य प्रवेशद्वारापासून धरमतर रस्ता परिसरात स्वच्छता करण्यात आली. रस्त्यालगतची गटारे, दुभाजकातील माती काढण्यात आली, तसेच ठिकठिकाणी कचराकुंड्या ठेवण्यात आल्या. वाढलेल्या झाडेझुडपे, गवताची छाटणी करण्यात आली. वाकलेले विद्युत खांब सुस्थितीत करण्यात आले. लोंबकळणाऱ्या वीजवाहिन्या योग्यप्रकारे लावण्यात आल्या. रस्त्यालगतचे अतिक्रमण हटवून औषध फवारणी करण्यात आली. अभियानात मुख्याधिकारी जीवन पाटील, मनोज पाटील, नगर अभियंता सुहास कांबळे, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, अंकिता इसळ, रेश्मा करबेले आदी उपस्थित होते.

एक जेसीबी, एक ट्रॅक्टर व पेण नगर परिषदेचे ६० सफाई कामगारांसह जवळपास १३० जण अभियानात सहभागी झाले होते. या वेळी गोळा करण्यात आलेला जवळपास दोन टन कचरा आंबेगावातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात टाकण्यात आला.

# भूमिहीन शेतकऱ्यांना रेडीरेकनर दर वाढवून मिळावा -गोपाळ तंतरपाळे

**महाड** : **प्रतिनिधी**

भूमिहीन शेतकऱ्यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजना आणि बिरसामुंडा आदिवासी सबलीकरण योजनांचा लाभ घेण्यासाठी कोकणातील जमिनींचे रेडिरेकनर दर वाढवून मिळावेत आणि इतर मागण्यांसाठी भिमशक्तीचे गोपाळ तंतरपाळे ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

भूमिहीन शेतमजुरांना एसटी आणि एसटी प्रवर्गांना घटनेने दिलेले न्याय हक्क मिळावे या मागणीसाठी संघटनेचे सरचिटणीस गोपाळ तंतरपाळे यांनी महाडमधील चवदार तळे येथे ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. संविधान दिनाचे औचित्य साधून हे आंदोलन छेडण्यात आल्याचे तंतरपाळे यांनी सांगितले.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजना आणि बिरसा मुंडा आदिवासी सबलीकरण स्वाभिमान योजना या योजनांचा लाभ एससी आणि एसटी प्रवर्गाला मिळतो, मात्र याकरीता लागणारी जमीन शासनाकडून संपादित केली जाते. कोकणात जमिनींचे दर वाढले, मात्र रेडीरेकनरचे दर कमी असल्यामुळे लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेता येत नाही. यामुळे महाड, दापोली, पंधेरी येथील ४१२ एकरची फाईल तसेच श्रीवर्धन येथील १०५ एकरची फाईल मंत्रालयामध्ये प्रलंबित आहेत. शासनाने रेडीरेकनरचे दर वाढवून दिले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.



# हार्दिकच्या एन्ट्रीमुळे बुमराह नाराज?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमधील गुजरात टायटन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने घरवापसी करीत मुंबई इंडियन्सच्या संघात पुनरागमन केले, पण हार्दिकच्या एन्ट्रीमुळे अनेक नाट्यमय घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुंबई संघाचा आघाडीचा गोलंदाज जसप्रीत बुमराहने मुंबई सोशल मीडियावर एक बोलकी पोस्ट केली आहे. त्याचप्रमाणे इंडियन्सच्या फ्रँचायझीला सोशल मीडियावर अनफॉलो केल्याचे वृत्त आहे.

जगातील सर्वांत लोकप्रिय ट्वेंटी-२० लीग अर्थात आयपीएल आणि प्रसिद्धी यांचे समीकरण वेगळेच आहे. आयपीएलची क्रेझ एवढी आहे की यापुढे आंतरराष्ट्रीय सामन्यांचादेखील दबदबा कमी होतो. दोन महिने क्रिकेट विश्वाला आपलेसे करणारी ही बहुचर्चित लीग आपल्या आगामी हंगामाकडे कूच करीत आहे. आयपीएल २०२४ला सुरुवात होण्यासाठी आता अवघ्या काही महिन्यांचा कालावधी उरला आहे. यासाठी पुढील महिन्यात खेळाडूंची लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे, मात्र त्याआधीच आयपीएलचा आगामी हंगाम चर्चेचा केंद्रबिंदू बनला.

क्रिकेट वर्तुळात मागील काही दिवसांपासून चर्चेत असलेला हार्दिक पांड्या सोमवारी अधिकृतरित्या मुंबई इंडियन्सच्या संघाचा सदस्य झाला. पांड्याने आपल्या संघात घरवापसी केली असून आयपीएल २०२४मध्ये तो मुंबईच्या ताफ्यात दिसेल.



## सोशल मीडियावरील पोस्टमुळे चाहत्यांमध्ये चर्चांना उधाण

मुंबईचा घातक गोलंदाज जसप्रीत बुमराहने एक स्टोरी ठेवून चाहत्यांचे लक्ष वेधले. खरेतर रोहित शर्मानंतर जसप्रीत मुंबईचा कर्णधार होईल हे जवळपास स्पष्ट होते, पण आता पांड्याची घरवापसी झाल्यानंतर बुमराहची अडचण झाली असल्याची चर्चा आहे. अशातच त्याने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी ठेवून बोलकी प्रतिक्रिया दिली. लक्षणीय बाब म्हणजे एका वाक्यातच बुमराहने बरेचकाही सांगितले. कधीकधी शांत राहणे हेच सर्वोत्तम उत्तर असते, असे बुमराहने म्हटले.

### मुंबई फ्रँचायझीला अनफॉलो केल्याचेही वृत्त

हार्दिक पांड्या मुंबईचा पुढील कर्णधार असू शकतो अशा अफवा पसरत असताना जसप्रीत बुमराह नाराज असल्याचे कळते. खुद्द बुमराहने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी ठेवून याचे संकेत दिले. अशातच बुमराहने मुंबई इंडियन्सच्या फ्रँचायझीला सोशल मीडियावर अनफॉलोदेखील केले आहे. काही चाहत्यांनी बुमराह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघात जाणार असल्याचा दावा केला.

# नवी मुंबई हाफ मॅरेथॉनला धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने व लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये साडेचार हजारहून अधिक नागरिकांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


२१ किलोमीटरच्या हाफ मॅरेथॉनमध्ये १८ ते २९ वर्ष पुरुष गटात उदयसिंग पडवी आणि महिला गटात आरती देशमुख यांनी विजेतेपद पटकावले. ३० ते ३९ वर्ष गटात पुरुषांमध्ये शशी दिवाकर व महिलांमध्ये सोनिया प्रामाणिक यांनी, ४० ते ४९ वर्ष पुरुष गटात शिवानंद शेट्टी आणि महिला गटात वरुणा राव यांनी, तर साठ वर्षावरील पुरुष गटात भूपेंद्र हरदेव तसेच ५० ते ५९ महिला गटात गीतांजली लेंका यांनी विजेतेपद पटकावले.

प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. २१ किमीप्रमाणे १० व ५ किमी अंतराच्या पुरुष व महिला गटातील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

# माणगावमध्ये २ डिसेंबरपासून क्रिकेट प्रीमियर लीग रंगणार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या महासंग्रामाला २ डिसेंबरपासून सुरुवात होणार असून ही स्पर्धा १० डिसेंबरपर्यंत माणगाव मोर्बारोड मार्गावरील भव्य मैदानावर रंगणार आहे. क्रिकेटप्रेमींसाठी ही एक पर्वणी आहे.




यंदा या प्रीमियर लीगचे तिसरे पर्व आहे. या स्पर्धेत तालुक्यातील ३२ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेत प्रथम क्रमांक एक लाख रुपये, द्वितीय क्रमांक ५० हजार रुपये, तृतीय व चतुर्थ क्रमांक प्रत्येकी ३० हजार रुपये, पाचवा, सहावा, सातवा व आठवा क्रमांक प्रत्येकी १५ हजार रुपये तसेच इतर वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज यांना सायकल, मालिकावीर व प्रथम क्रमांक विजेत्या संघाच्या मालकास फ्रिज तसेच स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या संघातील २८ खेळाडूंना बूट अशी देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेची जोरदार तयारी प्रीमियर लीगचे संस्थापक तथा आयोजक माजी रायगड जिल्हा परिषद सभापती अॅड. राजीव साबळे, कार्याध्यक्ष तथा खरवली ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच संतोष खडतर, कार्याध्यक्ष तथा भुवन ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच दीपक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रीमियर लीगचे अध्यक्ष भाई दसवते, सल्लागार निलेश केसरकर, वैभव टेंबे, मंगू जाधव, उपाध्यक्ष फहद करबेळकर, सागर पाशिलकर, नंदुराज वाढवळ, सचिव वैष्णव साठे, सहसचिव रोहित रातवडकर, खजिनदार बाळा पोवार, निलेश उभारे, सहखजिनदार समीर महाडिक, सदस्य राहुल बक्कम, केदार जाधव, मुकुल मेहता व सहकाऱ्यांनी केली आहे.

# टी-२० वर्ल्डकपचा भारत मोठा दावेदार -रवी शास्त्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने नुकतीच एकदिवसीय विश्वचषक तिसऱ्यांदा जिंकण्याची सुवर्णसंधी गमावली आहे. वर्ल्डकपच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाने भारताला पराभूत केले. त्या पराभवाचे दुःख मागे ठेवून भारतीय संघ पुढे सरसावला आहे. भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी भारतीय संघाला २०२४ टी-२० विश्वचषक स्पर्धेचा सर्वांत मोठा दावेदार म्हटले आहे.



पीटीआयशी बोलताना रवी शास्त्री म्हणाले की, मी भारताला लवकरच विश्वचषक जिंकताना पाहत आहे. जरी एकदिवसीय क्रिकेटमध्ये हे इतक्या लवकर होणार नाही, परंतु टी-२० क्रिकेटमध्ये भारत इतर संघांसाठी एक मोठे आव्हान असेल. या फॉरमॅटमध्ये आपल्याकडे अनेक शानदार खेळाडू आहेत. तुम्हाला फक्त त्याकडे लक्ष द्यावे लागेल, कारण विश्वचषकासारखी गोष्ट तुम्हाला इतक्या सहजासहजी मिळत नाही. सचिनसारख्या खेळाडूला यासाठी सहा विश्वचषकांची प्रतीक्षा करावी लागली होती.

शास्त्री पुढे म्हणाले की, तुम्ही विश्वचषक इतक्या सहजासहजी जिंकू शकत नाही, तुम्हाला तो जिंकण्यासाठी खूप कष्ट करावे लागतील तसेच वर्ल्डकप फायनलसारख्या मोठ्या मंचावर तुम्हाला चांगली कामगिरी करावी लागेल. एकदा तुम्ही फायनलमध्ये पोहचलात की, तुम्ही आतापर्यंत स्पर्धेत काय केले आहे याने काही फरक पडत नाही. तुमचा खेळ तुम्हाला चॅम्पियन बनवतो.

जून २०२४मध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० वर्ल्डकप होणार आहे. या पार्श्वभूमीवर शास्त्रींनी म्हटले की, आगामी विश्वचषक स्पर्धेत भारताकडे अनेक युवा खेळाडू आहेत, जे विश्वचषकासारख्या व्यासपीठावर चांगली कामगिरी करू शकतात. एकदिवसीय विश्वचषक जिंकणे इतके सोपे नाही, कारण तुम्हाला संघाची पुनर्बांधणी करावी लागेल, परंतु टी-२०मध्ये सध्या चांगला संघ आहे. विश्वचषक खेळू शकणारे अनेक नामवंत खेळाडू याआधीच पुढे आले आहेत.



# पनवेलमधील जलतरणपटूंचा राष्ट्रीय स्पर्धेत पदकांचा स्ट्रोक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील दोन जलतरणपटूंनी विविध प्रकारांमध्ये पदके पटकावून पनवेलचे नाव उंचावले आहे. हसन शेख (वय २५) आणि सनी राजेश टाक (वय २८) अशी या जलतरणपटूंची नावे आहेत.

हसन आणि सनी यांनी कर्नाटकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भारतीय जलतरण महासंघ संलग्न १९व्या राष्ट्रीय मास्टर्स चॅम्पियनशिपमध्ये सहभाग घेतला. स्पर्धा मंगळुरू जलतरण तलाव येथे झाली. या स्पर्धेत हसनने १०० मीटर बटरफ्लाय आणि ४ बाय ५० मीटर फ्री स्टाइल प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर सनीने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक आणि ४ बाय ५० मीटर फ्री स्टाइल रिलेत अनुक्रमे कांस्य आणि सुवर्णपदक जिंकले. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.







(छाया : विकास म्हात्रे)

# पनवेलमधील नेवाळी येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई गावदेवी प्रसन्न गौरी स्पोर्ट्सच्या वतीने नेवाळी येथे आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.२८) झाले.

पनवेल तालुक्यात क्रिकेटचा हंगाम सुरू झाला आहे. नेवाळी येथे आई गावदेवी प्रसन्न गौरी स्पोर्ट्सच्या वतीने आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन राजेश काथारा आणि आकाश काथारा यांनी २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबरदरम्यान केले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मैदानात उतरून फटकेबाजी केली तसेच त्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतलेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

विजय हजारे करंडक स्पर्धा

# त्रिपुराकडून गतविजेत्या सौराष्ट्र संघाचा धुव्वा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमधील ५० षटकांची सर्वांत मोठी स्पर्धा विजय हजारे करंडक स्पर्धेत अनुभवी भारतीय फलंदाज चेतेश्वर पुजाराच्या उपस्थितीत गतविजेत्या सौराष्ट्रला सोमवारी पराभव पत्करावा लागला. विजय हजारे करंडक राष्ट्रीय एकदिवसीय स्पर्धेतील अ गटातील सामन्यात त्रिपुराविरुद्ध १४८ धावांच्या मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. प्रथम फलंदाजी करताना त्रिपुराने ५० षटकांत ८ गडी गमावून २५८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात सौराष्ट्रला ३१.४ केवळ ११० धावा करता आल्या.

गणेश सतीश (७४ चेंडूत ७२ धावा), सुदीप चॅटर्जी (९३ चेंडूत ६१ धावा) आणि बिक्रम कुमार दास (७६ चेंडूत ५९ धावा) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर त्रिपुराने आठ गड्यांच्या मोबदल्यात २५८ धावा केल्या होत्या. यानंतर जयदीप देवच्या (१५ धावांत पाच बळी) शानदार गोलंदाजीमुळे सौराष्ट्रचा डाव ३१.४ षटकांत केवळ ११० धावांवर आटोपला.

अनुभवी डावखुरा गोलंदाज जयदेव उनाडकटने सौराष्ट्रकडून ३५ धावांत पाच विकेट घेतल्या, पण त्याचा संघाला काही फायदा झाला नाही. लक्ष्याचा पाठलाग करताना सौराष्ट्रला सुरुवातीलाच वेगवान गोलंदाज मूरा सिंग आणि राणा सिंग यांनी दोन मोठे धक्के दिले. त्यामुळे हार्विक देसाई, शेल्डन जॅक्सन आणि चिराग जानी अवघ्या १३ धावांच्या धावसंख्येपर्यंत पॅव्हेलियनमध्ये परतले. पुजारा (२४) आणि अर्पित वसावडा (१६) यांनी चौथ्या विकेटसाठी ३७ धावांची भागीदारी करून संघाला सामन्यात परत आणण्याचा प्रयत्न केला. विक्रम देबनाथने पुजारा पायचित करून ही भागीदारी तोडली. त्यानंतर संघाचा डाव संपुष्टात आला.

गुजरातचा यष्टिरक्षक फलंदाज उर्विल पटेलने ४१ चेंडूत शतक झळकावून इतिहास रचला. लिस्ट-ए क्रिकेटमध्ये सर्वांत जलद शतक झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. विजय हजारे करंडक स्पर्धेत अरुणाचल प्रदेश विरुद्ध चंदीगड येथे झालेल्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली. २०१०मध्ये बडोद्याकडून खेळताना महाराष्ट्राविरुद्ध ४० चेंडूत शतक झळकावताना भारतासाठी सर्वात वेगवान लिस्ट ए शतक झळकावण्याचा विक्रम युसूफ पठाणच्या नावावर आहे. उजव्या हाताचा सलामीवीर उर्विलने आपल्या डावात नऊ चौकार आणि सात षटकार मारले आणि त्याच्या संघ गुजरातने १३ षटकांत १६० धावांचे लक्ष्य गाठले. विशेष म्हणजे रविवारी गुजरात टायटन्सने उर्विल पटेलला करारमुक्त केले होते.

# आयपीएलच्या प्रवासात हार्दिक पांड्या झाला मालामाल!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स संघाकडून ऑल-कॅश ट्रेडद्वारे व्यवहार झाल्यानंतर आता त्याची जुनी फ्रेंचायझी मुंबई इंडियन्समध्ये परतला आहे. मुंबई इंडियन्सने पांड्यासाठी गुजरात टायटन्सला १५ कोटी दिल्याचे समजतेय. आयपीएलच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत पांड्याच्या खेळाडू ते कर्णधार भूमिकेसह त्याचा पगारसुद्धा वाढला आहे.

प्राप्त माहितीनुसार यापूर्वी हार्दिक पांड्याने सात आयपीएल हंगामांसाठी मुंबई इंडियन्ससोबत करार केला होता. २०२२च्या हंगामापूर्वी मुंबई इंडियन्सने त्याला रिलीज केले होते. गुजरात टायटन्सचे त्यांच्या पदार्पणाच्या वर्षातच पांड्याकडे नेतृत्वाची संधी सोपवली. गुजरात टायटन्सच्या निर्मितीपासून एकदा विजेतेपद व एकदा उपविजेतेपद मिळवून दिल्यावर पांड्याला रिलीज करण्यात आले आहे.

मुंबई इंडियन्सने २०१५च्या लिलावात १० लाख रुपयांच्या मूळ किमतीत हार्दिक पांड्याला संघात समाविष्ट केले होते. तेथून पुढे मुंबई इंडियन्ससाठी सुवर्णकाळात पांड्याची रँकसुद्धा वाढत गेली.



## मुंबईचा कर्णधार होणार असल्याची चर्चा

नव्याने स्थापन झालेल्या आयपीएल फ्रँचायझी गुजरात टायटन्सने १५ कोटींमध्ये त्यांचा कर्णधार म्हणून पांड्याला संघात स्थान दिले. पांड्याने गुजरातला त्यांच्या पदार्पणाच्या मोसमात आयपीएल जेतेपद मिळवून दिले. त्याने १५ सामन्यांत (त्याच्या संघासाठी सर्वाधिक) ४८७ धावा केल्या, तर २७.७५च्या सरासरीने आणि ७.२८च्या इकॉनॉमीने त्याने आठ विकेट्स घेतल्या. आयपीएलच्या इतिहासात पदार्पणाच्या मोसमात ट्रॉफी जिंकणारा पांड्या दुसरा कर्णधार ठरला. आता मुंबई इंडियन्सकडे परतल्यावर रोहित शर्माचे कर्णधारपद पांड्याकडे सोपवले जाणार असल्याचीसुद्धा चर्चा आहे.

सहा वर्षांच्या कालावधीत मुंबईच्या चार विजेतेपदांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेल्या पांड्याने मागे वळून पाहिलेले नाही.

पहिल्या दोन हंगामात आपली छाप सोडण्यात अपयशी ठरल्यानंतर पांड्या अखेरीस २०१७मध्ये त्याच्या महत्त्वपूर्ण खेळींसह प्रसिद्धीच्या झोतात आला. याच हंगामात ३५.७१च्या सरासरीने आणि १५६.२५च्या स्ट्राइक रेटने त्याने २५० धावा केल्या. त्याने हंगामात सहा विकेट्ससुद्धा घेतल्या होत्या, ज्यामुळे मुंबई इंडियन्सने त्याला २०१८च्या मेगा लिलावापूर्वी ११ कोटींच्या किमतीत रिटेन केले. पांड्याने २०१८ आणि २०१९ मध्ये त्याच्या यशस्वी हंगामात अनुक्रमे २६० आणि ४०२ धावा केल्या. त्याने दोन मोसमात ३२ विकेट्सदेखील मिळवल्या, ज्यामुळे संपूर्ण अष्टपैलू म्हणून त्याचा दबदबा तयार झाला.

तीन सीझनसाठी राखून ठेवल्यानंतरा पांड्याला मुंबई इंडियन्सद्वारे २०२१च्या आवृत्तीपूर्वी रिलीज केले गेले, परंतु फ्रँचायझीने त्याला पुन्हा एकदा ११ कोटी रुपयांना विकत घेतले. तथापि, या अष्टपैलू खेळाडूला २०२१मध्ये हवे तसे यश हाती आले नाही १२ सामन्यांत केवळ १२७ धावा करणाऱ्या पांड्याला २०२२मध्ये मेगा लिलावापूर्वी पुन्हा एकदा मुंबईद्वारे रिलीज केले गेले, पण यामुळे पांड्याचे नशीब बदलले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com